अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर


सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. ३१ जुलै २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ३०२ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## नाशिकच्या भक्ताकडून श्री विठ्ठलाला ७ लाखांचा सोन्याचा हार अर्पण

✔ सुराज्य/सोलापूर

पंढरपूर येथील श्री विठ्ठलच्या चरणी नाशिक येथील ९१ वर्षाचे भक्त नामदेव पाटील यांनी ७ लाखांचा सोन्याचा हार अर्पण केला. कमला एकादशीच्या दिवशी हा कार्यक्रम पार पडला. पाटील हे वन खात्यातील सेवानिवृत्त कर्मचारी असून ते विठ्ठलाचे असिम भक्त आहेत. १०५ ग्रॅमचा हा हार त्यांनी आपल्या पेन्शनच्या रकमेतून तयार केला आहे.





## भिडे प्रकरणावरून राजकारण तापले

# फडणवीसांनी ठणकावले अखेर कारवाईचे संकेत दिले

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**सांगलीतील शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान या संघटनेचे संस्थापक संभाजी भिडे यांनी महात्मा गांधींबाबत केलेल्या आक्षेपार्ह विधानानंतर राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी हे राजकीय पक्ष आक्रमक भूमिका घेत रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. भाजप आणि भिडे यांचा घनिष्ठ संबंध आहे. त्यामुळेच त्यांच्यावर कारवाई होत नाहीय,असा आरोप करत विरोधकांनी उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्रीपद सांभाळणारे देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला. त्यामुळेच की काय? या प्रकरणावर फडणवीस यांना अखेर तोंड उघडावेच लागले. महात्मा गांधी यांचा अवमान सहन करणार नाही, अशा शब्दात सुनावतानाच त्यांच्यावर कारवाई करण्याचे संकेत फडणवीस यांनी दिले. दरम्यान भिडेंच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतल्यानंतर माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना धमकीचे फोन आले तसेच शिवप्रतिष्ठानचे कार्यकर्ते भिडे समर्थनार्थ रस्त्यावर उतरल्याने हा संघर्ष अधिक चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत.**



रविवारी नागपूर येथे बोलताना फडणवीस यांनी संभाजी भिडेंच्या वक्तव्याचा निषेध केला. महात्मा गांधींचा अपमान कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही.

संभाजी भिडे यांच्या वक्तव्याबाबत राज्य सरकार योग्य ती कारवाई करेल. भिडे यांच्या वक्तव्याचा मी पूर्ण निषेध करतो, असे फडणवीस म्हणाले. महात्मा गांधी हे राष्ट्रपिता आहेत. देशाच्या स्वातंत्र्याच्या इतिहासात त्यांच्याकडे एक महान नायक म्हणून पाहिले जाते.एवढ्या महान नायकाबद्दल असे विधान करणे पूर्णपणे अयोग्य आहे. भिडे गुरुजींनी असे विधान करू नये कारण अशा विधानांमुळे लाखो लोकांचा रोष निर्माण होतो,असा सल्लाही त्यांनी दिला.

### डोके ठिकाणावर आहे काय?

कोणतीही कारवाई होत नसल्याने भिडे हे वादग्रस्त विधाने करत आहेत. मुळात त्यांचक डोके ठिकाणावर आहे की नाही, हेच कळत नाही? असे म्हणत मंत्री छगन भुजबळ यांनी भिडे यांच्या वक्तव्याचा समाचार घेतला आहे. ते रविवारी नाशिकमध्ये बोलत होते.

### चव्हाण यांना धमकी

काँग्रेस नेते आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी याप्रकरणी भिडे यांना अटक करण्यात यावी, अशी आक्रमक मागणी अधिवेशनात केली होती. या घटनेनंतर पृथ्वीराज चव्हाण यांना रविवारी फोनद्वारे तसेच मेलद्वारे अज्ञात व्यक्तीकडून धमकी देण्यात आली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून त्यांच्या निवासस्थानी पोलीस बंदोबस्त वाढविला आहे. चव्हाण यांनी अटकेची मागणी केल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवीस यांनी योग्य कारवाई करू, असे म्हटले होते.

### वादग्रस्त वक्तव्याची मालिका सुरुच

भिडे यांच्या वादग्रस्त वक्तव्याची मालिका काही थांबता थांबत नाही. यावरुन वाद सुरु असतानाच शनिवारी पुन्हा एक वक्तव्य भिडे यांनी केले. अखंड हिंदुस्थानासाठी पंडित जवाहरलाल नेहरु यांचे नखाएवढेही योगदान नसल्याचे वक्तव्य भिडे यांनी केले आहे. त्यामुळे देशभरात त्यांच्या वक्तव्याचा निषेध केले जात आहे.

### यशोमती ठाकूर यांच्यावर कारवाईची मागणी

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे कार्यकर्ते आणि भाजप खासदार अनिल बोंडे यांनी अमरावतीत पोलीस ठाण्यात दाखल होत काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांच्यावर कारवाईची मागणी केली. दोन दिवसांपूर्वी अमरावतीमध्ये भिडे यांनी महात्मा गांधी यांच्या बद्दल वादग्रस्त विधान केले होते. काँग्रेसच्यावतीने निषेध नोंदवत यशोमती ठाकूर यांनी बोलताना महात्मा गांधी यांच्याविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या भिडेविरोधात आक्रमक भूमिका घेतली. यशोमती ठाकूर यांनी संतापून त्यावेळी हरामखोर या शब्दाचा उल्लेख केला होता. या शब्दावरुन शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संघटनेचे कार्यकर्ते आक्रमक झाले. त्यांनी कोतवाली पोलीस स्टेशनला घेराव घालत यशोमती ठाकूर यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.



## आम्ही तिघांनी ठरवले तर महाराष्ट्रात काहीही घडू शकते

### शरदरावांच्या सूचक विधानाने चर्चेला उधाण

✔ सुराज्य/मुंबई

महाराष्ट्रात कधी काय राजकीय घडामोडी घडतील याचा नेम राहिलेला नाही. अशातच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी एक सूचक वक्तव्य केले आहे.मी,उद्धव आणि बाळासाहेब थोरात या तिघांनी ठरवले तर महाराष्ट्रात काहीही घडू शकते,अशी गर्जना पवारांनी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवारांनी बंड केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेनेचे (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेसचे विधिमंडळातील गटनेते बाळासाहेब थोरात हे रविवारी धुळ्यातील एका कार्यक्रमात प्रथमच एका मंचावर आले होते. त्यावेळी पवार बोलत होते.

या कार्यक्रमात शरद पवारांनी वि.का. राजवाडे संशोधन मंडळ संस्थेच्या कार्याबद्दलही गौरवोद्गार काढले. ते म्हणाले, 'धुळ्यात जे काम चालू आहे ते वाढवणे गरजेचे आहे.' इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन संस्थेला यशवंतराव चव्हाण सेंटर तर्फे सहाय्यता निधीही पवारांनी घोषित केला.

### काय म्हणाले शरद पवार?

आता सध्या आम्हाला राज्य शासनाशी बोलणे अवघड आहे. मात्र, उद्धव ठाकरे, बाळासाहेब थोरात आणि मी सुद्धा येथे आहे. आम्ही तिघांनी जर ठरवले तर महाराष्ट्रात काही बदल होईल. असे वक्तव्य करुन राज्यातील राजकारणात येत्या काळात काही बदल होतील, असे संकेत शरद पवार यांनी दिले आहेत.

## हुंडा आणि गर्भपात करण्यासाठी विवाहितेस मारहाण

✔ सुराज्य/माळशिरस

लग्नात सोने दिले नाही, तुला वेड लागले आहे, पोटातील गर्भ खाली करून सोडचिठ्ठी दे अन्यथा ट्रॅक्टर घेण्यासाठी माहेर येथून ५ लाख रुपये आणावेत म्हणून एका २२ वर्षीय विवाहितेला सासरी मारहाण करून छळ केल्याची घटना कुसमोड (ता.माळशिरस) येथे नुकतीच उघडकीस आली. या प्रकरणात माळशिरसच्या पोलिसांनी विवाहितेचा पती, सासू आणि सासरे या तिघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे .

या संदर्भात ज्योती दादासाहेब कपने (वय २२ रा . कुसमोड) हिने नुकतीच पोलिसात फिर्याद दाखल केली. पिलीव येथे राहणाऱ्या ज्योती तिचा विवाह सप्टेंबर २०२० साली दादासाहेब कपने याच्यासोबत झाला होता. काही दिवस नीट नांदविल्यानंतर तिचा पती दादासाहेब, सासू संगीता आणि सासरे तुकाराम श्रीमंत कपने (सर्व रा.कुसमोड) यांनी वरील कारणावरून तिला मारहाण करून शारीरिक आणि मानसिक त्रास देत होते. असे ज्योती कपने हिच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास हवालदार वाघ करीत आहेत.

## उजनीची पातळी वजा ४ टक्क्यांपर्यंत

✔ सुराज्य/सोलापूर



सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या उजनी धरणाच्या पाणीपातळी दिवसेंदिवस वाढ होत आहे. वजा ३४ टक्क्यांवर गेलेले उजनी धरण रविवारी वजा ४ टक्क्यांवर आले आहे. येत्या ४८ तासात उजनी धरण प्लसमध्ये येणार असल्याने सोलापूरकरांच्या पाण्याची चिंता मिटली आहे.

सध्या उजनी धरणात पुणे जिल्ह्यातील खडकवासला, मुळा-मुठा धरणातून पाणी येत आहे. उजनीत १५ हजार ३८५ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. शिवाय उजनी धरण परिसरात पाऊस चांगला पडत असल्याने धरणाच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. सोलापूर शहराला उजनी धरणातून पाणीपुरवठा होतो. उजनीतील पाणीपातळी कमी झाल्याने महापालिकेने धरणावर दुबार पंपींग सुरू करून पाण्याचा उपसा करीत होते. मात्र आता धरणात पाणीपातळी वाढल्याने दुबार पंपींग बंद केला आहे. सध्या शहरातील नागरिकांना सहा दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे. विद्युत पुरवठा खंडित व अन्य कारणामुळे विस्कळीत होणारा पाणीपुरवठा सध्या सुरळीत सुरू असल्याचे पाणीपुरवठा विभागाचे म्हणणे आहे.

## विहिरीत पडून खैराटच्या तरूणाचा मृत्यू

✔ सुराज्य/अक्कलकोट



खैराट (ता. अक्कलकोट) येथे रविवारी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास पाय घसरून विहिरीत पडून २७ वर्षीय तरुण मरण पावला. परशुराम उर्फ प्रशांत नारायण पात्रे (वय २७, रा. खैराट, ता. अक्कलकोट) असे मृत्यू पावलेल्या तरूणाचे नाव आहे. त्याचे प्रेत सायंकाळी विहिरीतून काढुन उत्तरीय तपासणीसाठी अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले. प्रशांत पात्रे हा तरूण शिवशरण गायकवाड यांच्या शेतातील विहिरीत पाय घसरून पडला. अधिक तपास पोलीस हवालदार अंगद गीते हे करीत आहेत. मयत हा मोलमजुरी करून उपजिविका करत होता. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे.

## अल्पवयीन मुलीचा हात पकडून मोबाईल नंबर मागितल्या प्रकरणी तरुणावर पोक्सो अंतर्गत गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

पंधरा वर्षांच्या मुलीचा हात पकडून तिचा मोबाइल नंबर मागितल्याप्रकरणी तरुणावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. अभिषेक कोळी (रा. सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या तरुणाचे नाव आहे. पीडित मुलगी ही पंधरा वर्षांची असून,ती संगणकाच्या क्लासला गेली होती.ती जिन्यातून जात असताना आरोपी तिच्याजवळ आला व तिचा हात पकडून तुझा फोन नंबर मला दे, तू कोणत्या कॉलेजला डमिशन केले आहे, ते मला सांग,' असे बोलून लज्जास्पद वर्तन केले. शिवाय तू जर कोणाला सांगितलेस तर तुझ्या घरच्यांना बघून घेईन,' अशी धमकी दिली, अशा आशयाची फिर्याद पीडितेने दिली आहे. या फिर्यादीवरून आरोपीवर गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा अधिक तपास पोलिस करत आहेत.

## बाळे बस स्टॉपजवळ दोन गटात मारहाण

### चौघेजण जखमी

✔ सुराज्य/सोलापूर

बाळे येथील शिवाजीनगर बस स्टॉप जवळ पैसे देण्याच्या कारणावरून दोन गटात काचेची बाटली, तीक्ष्ण शस्त्र आणि लाथाबुक्क्याने झालेल्या मारहाणीत चौघेजण जखमी झाले. ही घटना रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली .

दीपक राम गौतम (वय २३ रा.बाळे ) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे.त्याला पैसे देण्याच्या कारणावरून सागर नावाचा इसम आणि त्याच्या साथीदारांनी काचेच्या बाटलीने डोक्यात मारून जखमी केले. त्यावेळी भांडण सोडविण्यास आलेला धीरज ढावरे हा देखील जखमी झाला.



तर दुसऱ्या गटातील भीमाशंकर दत्तात्रय पाथरूड (वय २४ रा. बुधवारपेठ, वडार गल्ली) हा जखमी झाला. शिवाजीनगर बस स्टॉप येथील ढावरे यांच्या भेळ हाऊस येथे तक्रार चालू असताना तो भांडण सोडविण्यास गेला होता. त्यावेळी बबलू ढावरे आणि धीरज नावाच्या इसमाने त्याला धारदार शस्त्राने हातावर मारहाण केली. त्यावेळी सोबत असलेले हर्षवर्धन राजेश आणि विजय कैलास आष्टूळ असे मधे पडले असता त्यांना देखिल मारहाण करण्यात आली . सर्व जखमींना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे .

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



शिक्षण खात्याने सांगितले आहे, एकही 'खिसा' शिवू नका म्हणून!

## अधिकाऱ्याच्या मुलाने केलेल्या श्रीविठ्ठलाच्या नित्यपूजेला आक्षेप

✔ सुराज्य/सोलापूर

पंढरपूरच्या श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचा कोणताही ठराव न करता मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या चिरंजीवांच्या हस्ते विठ्ठलाची नित्य महापूजा दुधाचा अभिषेक घालून करण्यात आली. त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होताच वारकरी सांप्रदायातून तीव्र संताप व्यक्त झाला.या प्रकाराला वारकऱ्यांनी आक्षेप घेतला आहे.

या घटनेची सखोल चौकशी करावी, अशी मागणी वारकरी पाईक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष ह.भ.प. रामकृष्ण महाराज वीर यांनी केली आहे. विठ्ठल-रुक्मिणीची दररोज नित्य महापूजा होत असते. ही पूजा भाविकांच्या हस्ते करण्यासाठी हजारो रुपयांची देणगी स्वीकारली जाते. मात्र सर्वसामान्य भाविकांना नित्यपूजेचा मान मिळत नाही. मंदिर समिती कार्यकारी अधिकार्यांना कुटुंबासह नित्यपूजा करायची असेल तर मंदिर समितीचा ठराव करणे बंधनकारक असते.

मात्र कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या चिरंजीवाने विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचा कोणताही ठराव न करता नित्यपूजेचा महाअभिषेक केला. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला.याप्रकरणी शेळके यांनी दिलगिरी व्यक्त केल्याचे सांगण्यात आले.



मंदिर सरकारकडे आल्यानंतर विषमता दूर होऊन भाविकांना समानतेची वागणूक मिळेल, ही आशा फोल ठरली आहे. मागील काळात गाभा–यात झालेले अंघोळीचे प्रकरण असो, सभामंडपात भजनबंदीचा आदेश असो की– अधिका–याचा मुलगा आता केलेला दुग्धाभिषेक असो, या गोष्टीमुळे सामान्य वारकरी भाविक व्यथित होतो. नित्यपूजेला हजारो रुपये मोजूनही असा अभिषेक करता येत नाही. यावर तत्काळ कारवाई होणे अपेक्षित आहे.

**– रामकृष्ण महाराज वीर, प्रदेशाध्यक्ष, वारकरी संप्रदाय पाईक संघ.**

# ‘इंडिया’चे त्रांगडे...

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वारूला रोखण्यासाठी विरोधी पक्षांची आघाडी झाली. तिचे इंडिया असे नामकरण करण्यात आले आहे. राहुल गांधी आणि ममतादीदी यांच्या संकल्पनेतून हे नाव ठेवण्यात आल्याचे सांगण्यात येते. आघाडी बनवताना आणि त्याचे नामकरण करताना आघाडीच्या बैठकीत राहुल व दीदी यांचाच वरचष्मा होता. ही बाब आघाडीसाठी प्रयत्न करणारे नितीश कुमार हे तसे अडगळीतच पडले होते. आघाडी सध्यातरी रुळावर आहे. पुढे काय होईल हे सांगता येत नाही. कारण नितीश हे आघाडीपासून दूर चालल्याची चर्चा आहे. यादव यांच्या त्रासाला ते कंटाळले असून नितीश हे परत एकदा एनडीएशी जवळीक करत असल्याच्या बातम्या बिहारमधून येतायेत. आघाडीत हा यक्षप्रश्न आहे, तो जागा वाटपाचा. विशेष करून महाराष्ट्रात जागा वाटपाचे त्रांगडे निर्माण होणार असल्याचे संकेत आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू झाली असतानाच राज्यात भाजप-शिवसेना शिंदे गट-राष्ट्रवादी अजित पवार गटाची महायुती तसेच काँग्रेस-राष्ट्रवादी शरद पवार गट -शिवसेना ठाकरे गट यांची इंडिया आघाडी या दोन्ही आघाड्यांमधील तीन पक्षांमध्ये जागावाटप करताना मोठा तिढा निर्माण होण्याची शक्यता दिसते. आगामी लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू झाली असतानाच राज्यात भाजप-शिवसेना शिंदे गट-राष्ट्रवादी अजित पवार गटाची महायुती तसेच काँग्रेस-राष्ट्रवादी शरद पवार गट-शिवसेना ठाकरे गट यांची ‘इंडिया’ आघाडी या दोन्ही आघाड्यांमधील तीन पक्षांमध्ये जागावाटप करताना त्रांगडे निर्माण होणार आहे. प्रत्येक पक्षाला अधिकच्या जागा हव्या असल्याने दोन्हींकडे जागावाटप ही



प्रक्रिया सोपी नसेल. लोकसभा निवडणुकीची भाजपने तयारी सुरू केली आहे. कोणत्या मतदारसंघातील परिस्थिती कशी असेल याची सारी माहिती जमा केली जात आहे. पक्षाच्यावतीने मतदारसंघनिहाय आढावा घेतला जात आहे. राष्ट्रवादी महायुतीमध्ये सहभागी झाल्याने जागावाटपाचे नियोजन त्या पद्धतीने करावे लागणार आहे. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत भाजप २५ तर शिवसेना २३ जागांवर लढले होते. भाजप २५ किंवा कमी जागा लढणार नाही. भाजप २५ ते ३० जागा लढण्याचे नियोजन करीत आहे. उर्वरित १८ जागा या शिंदे गट आणि राष्ट्रवादीला वाटून दिल्या जातील. शिवसेनेच्या गेल्या वेळी १८ जागा निवडून आल्या होत्या. पण नव्या समीकरणात भाजप शिंदे गटाला एवढ्या जागा सोडण्याची शक्यता कमी आहे. गेल्या वेळी राष्ट्रवादीचे चार खासदार खासदार निवडून आले होते. अजित पवार गटाला या चार जागा तर हव्या आहेतच पण याशिवाय अधिक जागांवर दावा आहे. भाजपने शिंदे गटाला १० ते १२ तर अजित पवार गटाला पाच-सहा जागा सोडण्याचे नियोजन केले आहे. महायुतीमध्ये जागावाटप हे सारे अमित शहा यांच्या पातळीवर होईल. यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे वा उपमुख्यमंत्री अजित पवार यांना घासाघीस करायला फारसा वाव नसेल, असे भाजप नेते खाजगीत बोलतात. महायुतीमध्ये अमरावतीची जागा कोणाच्या वाट्याला जाणार याबाबत अद्याप स्पष्टता नाही. या मतदारसंघाच्या अपक्ष खासदार नवनीत राणा यांनी गेली चार वर्षे भाजपला साथ दिली. तसेच उद्धव ठाकरे यांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली. या साऱ्या घडामोडी नवनीत राणा यांना भाजपची उमेदवारी मिळण्यासाठी अनुकूल ठरतील, असे दिसते. पण स्थानिक भाजपच्या नेत्यांचा राणा यांना विरोध आहे. यामुळे दिल्लीच्या पातळीवरच अमरावतीचा निर्णय होईल, असेही भाजपमध्ये बोलले जाते. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या बंडानंतर शिवसेना आणि राष्ट्रवादीची ताकद घटली आहे. परिणामी इंडिया किंवा महाविकास आघाडीतील सारीच समीकरणे बदलली आहेत. भाजपबरोबर युतीत शिवसेनेचे १८ खासदार निवडून आले होते. यामुळे या जागांवर उद्धव ठाकरे आग्रही राहणार, हे निश्चित असेल. राष्ट्रवादी नेहमीच जागावाटपात शेवटपर्यंत घोळ घालते हा अनुभव आहे. राष्ट्रवादी आणि शिवसेना कमकुवत झाल्याने काँग्रेसला अधिक जागांची अपेक्षा आहे. इंडियामधील जागावाटप सोपे व सरळ नाही. महायुतीत अमित शहा यांच्या शब्दाबाहेर शिंदे वा अजित पवार जाणार नाहीत. इंडियामध्ये मात्र आनंदीआनंद असेल असेच एकूण चित्र आहे. निवडणुकीला अद्याप ९ महिन्यांचा कालावधी असल्याने आणखी काय समीकरणे बदलतात यावरही सारे अवलंबून असेल.

---

सामाजिक

# धैर्य देऊन सावरणारी मनोधैर्य योजना



मो. सलमान आझमी
प्रमुख जिल्हा न्यायाधीश सोलापूर

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरचे ब्रीद वाक्य आहे, सक्षम- संवेदनशील-समृद्ध. विधी सेवाद्वारे राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली [NALSA] आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा, मुंबई यांच्या दिशा-निर्देशानुसार विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७ च्या मधील तरतुदींच्या आधारे विधी क्षेत्राचे कार्य केले जात आहे. कायदेविषयक जनजागृती शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ तसेच विविध कार्यक्रमांद्वारे पथनाट्य, चर्चासत्र, वक्तृत्व स्पर्धा, आधी माध्यमातून जनजागृतीचे कार्य अतिशय शिस्तबद्धपणे केले जाते. शिबिर आणि गावोगावी कायदेविषयक जनजागृतीच्या कार्यक्रमाद्वारे अधिनियमांचा केंद्र बिंदू असलेल्या नागरिकांपर्यंत विविध उपक्रम पोहचण्याचा प्रयत्न प्राधिकरण करत असते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरचे जनजागृतीचे कार्य सर्व सामान्य नागरिकांपर्यंत पोहचत असल्याची प्रचिती येत आहे. कारण, दुर्बल, आर्थिकदृष्ट्या कमकुवत, महिला, ज्येष्ठ नागरीक, विशेष संवर्गातील व्यक्ती यांच्यासाठी विधी सेवेकरिता प्राधिकरण निशुल्क धाव घेत असते.

सन २०२१ ते जुलै २०२३ या कालावधीत ७८० व्यक्तींना नि:शुल्क विधी सेवा पुरविली आहे. ज्यामध्ये कौटुंबिक वाद, वैवाहिक वाद, कौटुंबिक हिंसाचार आणि दिवाणी स्वरूपाचा वाद यांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त मध्यस्थी प्रक्रियेच्या माध्यमातूनही अशा प्रकारचे वाद तडजोडीने संपुष्टात आणत असते. केंद्र शासनाने २०१३ साली मनोधैर्य योजना सुरू केली. ही योजना महाराष्ट्र राज्यात २ ऑक्टोबर २०१३ पासून कार्यान्वित झाली. या योजनेत सर्वोच्च न्यायालय यांच्या न्यायनिर्णय आणि निर्देशानुसार परिस्थितीसापेक्ष सुधारणा करण्यात आली. त्यानुसार सुधारित नवीन मनोधैर्य योजना या शीर्षकान्वये अर्थसहाय्य हे बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ला, अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ अशा पीडित व्यक्तींना या योजनेअंतर्गत त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टिकोनातून नुकसान भरपाई म्हणून दिले जाते. सदरील अर्थसहाय्य १० लाखांपर्यंत गुन्हा, घटना आणि परिणामांचे स्वरूप यांचा

## ५२ पीडितांना ३९ लक्ष रुपयांचे अर्थसहाय्य

विचार करून दिला जातो.

सदरील अर्थसहाय्य हे संबंधित पीडित व्यक्तींच्या भविष्याचा विचार करून आणि गुन्ह्यातील पीडित म्हणून त्यांच्यावर होणारा परिणाम (मानसिक, सामाजिक) आदी बाबींचा दूरदृष्टीने विचार करून दिला जातो. अशाप्रकारचे अर्थसहाय्य देण्यासाठी प्राधिकरणामार्फत समिती गठीत करण्यात आली असून, ज्यामध्ये प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर, वैद्यकीय अधिकारी, पोलीस अधिकारी, सामाजिक कार्यकर्ता, अशासकीय संस्थेचे प्रतिनिधी यांचा समावेश असतो. ही समिती नमूद गुन्ह्यांच्या अनुषंगाने आलेला अर्ज आणि कागदपत्रांची पडताळणी करून अर्थसहाय्य संबंधित पीडितेस देत असते. सदरील अर्ज पीडिता स्वत:, पोलीस, सामाजिक कार्यकर्ता, अशासकीय संस्थेचे प्रतिनिधी किंवा पीडितेचे नातेवाईक, फिर्याद वैद्यकीय अहवाल, कलम १६४ फौजदारी प्रकिया संहिता १९७३ अन्वये नोंदविलेले न्यायदंडाधिकारी यांचेसमोरील निवेदन या कागदपत्रासह जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे करता येते. अशा स्वरूपाच्या



Maharashtra Manodhairya Yojana

गुन्ह्यात अज्ञान बालक, बालिका, लैंगिक शोषित पीडिता यांच्या मानसिकतेवर प्रभाव पडतो तसेच समाजाचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोनही बदललेला असतो. तथापि सदरील व्यक्ती ही त्या गुन्ह्यातील पीडिता असते आणि त्यांच्यावर ओढवलेल्या परिस्थितीचा सर्व साकल्याने विचार होत नाही. यामुळेच अशा व्यक्तीचे पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने आर्थिक सहाय्य पुरवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सक्षमरित्या समाविष्ट करून घेण्यासाठी ही मनोधैर्य योजना लाभदायक ठरते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांनी २०२२ ते जुलै २०२३ या काळात ३९ लक्ष रुपये या मनोधैर्य योजने अंतर्गत ५२ पीडितांना (बालक, बालिका, महिला) पुरवले असून, या योजनेचा मूळ हेतू सफल ठरावा, अशी कार्यपद्धती अवलंबली आहे. अर्थात ही सर्व कार्यपद्धती अवलंबत असताना पीडित व्यक्तीचे नाव हे गोपनीय ठेवले जाते. अशारितीने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर आपले कार्य अधिनियम १९८७ च्या तरतुदींना अधीन राहून पात्र लाभार्थ्यांना सहाय्य पुरवित आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर अत्यंत कुशलतेने विधी सेवेचं कार्य पार पाडत आहे. सन २०२१ साली २१२, सन २०२२ साली ३७० आणि जुलै २०२३ पर्यंत १९८ व्यक्तींना नि:शुल्क विधी सेवा पुरविली आहे. आकडेवारी ही प्राधिकरणाचं कार्य स्पष्ट करणारी आणि बोलकी आहे. प्राधिकरणाच्या पटलावरील २३ विधिज्ञासह, फौजदारी प्रकरणात ७ लोक अभिरक्षक कार्यालयातील विधी सेवा सहाय्य संरक्षण सल्लागार आपापली कर्तव्ये अधिनियमातील तरतुदीनुसार पार पाडत आहेत. मनोधैर्य योजनेच्या माध्यमातून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर अत्यंत संवेदनशीलपणे अर्जाची पडताळणी करून पात्र पीडित व्यक्तींना अर्थसहाय्य पुरवित आहे.

या वर्षभराच्या कालावधीत ५२ पीडित व्यक्तींना गुन्ह्याच्या स्वरूपानुसार ३९ लक्ष रुपये त्यांच्या बँक खात्यात वर्ग केले आहे. ज्याद्वारे पीडित व्यक्ती स्वत:चे पुनर्वसन करू शकेल. कायदेविषयक जनजागृतीपर कार्यक्रमासह विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७ च्या अधीन राहून सर्व प्रकारची विधी सेवा पात्र लाभार्थ्यांना प्राप्त व्हावी, यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर कायम प्रयत्नशील आहे. तसेच प्राधिकरणाकडे विधी सेवेसाठी प्राप्त होणारे अर्ज हे प्राधिकरणाचे विधी सेवेचे कार्य सामान्यांपर्यंत पोहचत असल्याची प्रचिती येत आहे.

**- नरेंद्र जोशी,**
सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर.

---

टुडेज् ब्लॉग

# आठवणीतले जयंतराव...

**मराठी - हिंदी सिनेमा आणि मराठी नाट्य क्षेत्रातील ज्येष्ठ अभिनेते आणि रंगकर्मी जयंत सावरकर म्हणजेच अवघ्या मराठी मनोरंजन विश्वाचे अण्णा. वयाच्या ८८ व्या वर्षापर्यंत या मनोरंजन क्षेत्रात कार्यरत असणारे चिरतरुण अभिनेते जयंत सावरकर हे सगळ्यांचेच लाडके अण्णा होते. त्यांच्या निधनाचे वृत्त कळाले, तेव्हा अण्णा आम्हाला ज्या-ज्या वेळी भेटले. त्या-त्या वेळेच्या आठवणी डोळ्यासमोर उभ्या राहिल्या. त्यांच्या निधनाने अवघ्या मराठीसह, हिंदी मनोरंजन विश्वावर एक शोककळा पसरली. वयाच्या ८८ व्या वर्षी जयंत सावरकर यांनी अखेरचा श्वास घेतला. अण्णांनी शंभराहून अधिक मराठी नाटक ३० हून अधिक हिंदी सिनेमांत काम केलं आहे.**

जयंत सावरकर हे ३७ वर्षापूर्वी म्हणजे सन १९८६ साली अभिनेते बाळ कर्वे यांच्या समवेत ते दोघेही सोलापूरला एका कार्यक्रमानिमित्त आले होते. त्यानंतर त्यांनी सोलापुरातील आमचे सांस्कृतिक, नाट्य आणि साहित्य क्षेत्रात कार्यरत असणारे उत्सवमूर्ती ॲड. जयंत कुलकर्णी म्हणजेच (जे. जे.) यांच्या सावली निवासस्थानी आले होते. जे. जे. यांनी मला लगेच बोलावून घेतले आणि त्यावेळी त्यांनी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूर शाखेत माझा आजीव सदस्याचा अर्ज भरून घेतला. त्याच वेळेला मी सोलापूरच्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूर शाखेचा आजीव सदस्य झालो. त्यांच्यामुळे मला नाट्य परिषदेचा सभासद होता आले. माझ्या या अर्जावर अभिनेते जयंत सावरकर यांची सूचक म्हणून, तर अभिनेते बाळ कर्वे यांची अनुमोदक म्हणून स्वाक्षरी मिळणं हे माझे भाग्यच आणि माझ्यासाठी तर ही खूप मोठी आठवण आहे.



त्यानंतर सन २०१५ ला महाराष्ट्र साहित्य परिषद पुण्याच्यावतीने गुहागर येथे विभागीय साहित्य संमेलन झाले होते. त्या संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी जयंत सावरकर आले होते. त्यावेळी मी विभागीय मराठी साहित्य संमेलनाचा निमंत्रक म्हणून कार्यरत होतो. तेव्हा त्यांची भेट झाली होती. अण्णा मूळचे गुहागरचे त्यांनी आम्हाला त्यांचे स्वतःचे घरही दाखवले होते. तसेच सोलापूरलाही सन २०१८ साली महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सोलापूर शाखेच्या अमृत-महोत्सवानिमित्त सोलापूर आकाशवाणी आणि साहित्य परिषदेच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला होता. ते त्या कार्यक्रमाला आले असतानाही भेट त्यांची झाली होती. सन २०१७ रत्नागिरी येथे झालेल्या ९७ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ अभिनेते जयंत सावरकर यांची निवड झाली होती. या नाट्यसंमेलनाच्या निमित्ताने त्यांची रत्नागिरी येथेही आम्ही भेटलो होतो ते भरभरून बोलायचे. त्यांनी केलेल्या नाटकातील आणि चित्रपटातील अभिनयाविषयी मनमोकळेपणाने गप्पा मारायचे आणि आपुलकीने चौकशीही करायचे.


संगीत रंगभूमी, बालरंगभूमी, प्रायोगिक रंगभूमी, हौशी रंगभूमी, व्यावसायिक रंगभूमी अशा सगळ्या प्रवाहात त्यांनी स्वत:ला आजमावून पाहिले. या दरम्यान ‘तुझे आहे तुजपाशी’तील आचार्य, ‘एकच प्याला’तील तळीराम, व्यक्ती आणि वल्ली’तील अंतूबर्वा आणि हरीतात्या या भूमिकांवर त्यांनी आपली छाप पाडली. ‘एकच प्याला’तील पल्लेदार संवाद ते लिलया सादर करीत. दूरदर्शनवरील गजरा, आकाशवाणीवरील टेकाडे भावजी, हे त्यांचे कार्यक्रम अत्यंत लोकप्रिय झाले होते. लोक आवडीने दूरदर्शनच्या समोर आणि त्यानंतर रेडिओ समोर कान देऊन कार्यक्रम पाहायचे आणि ऐकायचे. कुणाचा प्रयोग एखाद्या कलावंताअभावी अडत असेल तर ते आयत्या वेळीही त्यात उभे राहत आणि तो प्रयोग ढकलून नेत. त्यामुळे आपल्या ८०-८५ वर्षांच्या रंगमंचीय कारकिर्दीत ते शेवटपर्यंत नेहमीच सर्वांना हवहवेसे वाटायचे. इतकंच नाही तर जयंत सावरकर हे कलाकारांसाठी एक विद्यापीठच होते. चांगलं काम करा असा आशीर्वाद ते नेहमीच प्रत्येकाला देत असायचे, अशा या ज्येष्ठ अभिनेत्याला आणि अनेक नाटकातून रंगभूमी गाजवणाऱ्या ज्येष्ठ रंगकर्मी जयंत सावरकर या ’नटसम्राटाला’ भावपूर्ण आदरांजली.

**- पद्माकर कुलकर्णी, सोलापूर.**

---

जन्म हा अखेरचा

## भावार्पितस्थल



हे सारे आपले मन विशाल करण्यासाठी करायचे असते. शिवोऽहम् भावनेमुळे आपले मन अत्यंत विशाल होते. मोठे घर बांधून कुणीही मोठे होत नसते. उच्च पदावर बसून कुणीही मोठे होत नाही. ज्याचे मन मोठे तो मोठा.

तन, मन आणि धन अशा तीन वस्तू आपल्या जवळ असतात. मन मध्यम ठेवा, मन महान करा आणि धन कमी करा. तरच तुम्ही साधक होऊ शकाल. तन मध्यम ठेवणे म्हणजे काय? ते अत्यंत कृश नसावे. अत्यंत लठ्ठ नसावे. याचा अर्थच ते निरोगी असावे. आपण मात्र अधिकाधिक धन मिळविण्याचा प्रयत्न करतो आणि त्यासाठी वाट्टेल त्या मार्गाचा अवलंब करतो. धन अधिक असेल तर मन सर्वकाळ त्यातच गुंतून जाते. धन कमी करणे म्हणजे आपल्या अपेक्षा कमी करणे. दुसऱ्याच्या घरातील वस्तू पाहून त्या आपल्या घरात हव्या अशी अपेक्षा करु नये. त्यांच्या घरी फ्रीज आहे, मग आपल्याही घरात हवा. कशासाठी? ज्याला रोज ताजी भाजी आणायची असते, त्याने फ्रीज कशासाठी घ्यावा? ज्यांना ताजे अन्न शिक्षके करुन पुन्हा खायचे असते त्यांना फ्रीज पाहिजे असतो. बऱ्याच अनावश्यक वस्तू आपण केवळ प्रतिष्ठेसाठी विकत घेत असतो. आपल्या अपेक्षावर नियंत्रण ठेवणे म्हणजे धन कमी करणे होय. याचाच अर्थ असा की, आवश्यक तेवढा धनसंग्रह करावा.

मन मात्र मोठे करावे, मन महान होईल तरच तुम्ही मोठे व्हाल. संकुचित मनाचा माणूस स्वार्थी असतो. विशाल मनाचा माणूस मात्र नि:स्वार्थी असतो. महात्मा गांधींचा जगाने ‘महात्मा’ म्हणून गौरव केला. काय होते गांधीजींकडे? सर्वांग झाकतील एवढी वस्त्रदेखील नव्हती. परंतु आपले देशबांधव सुखी व्हावेत अशी तळमळ त्यांच्या मनाला लागून राहिली होती. त्यांनी जन्मभर स्वत:ची नव्हे तर देशबांधवांची चिंता वाहिली. त्यांच्याच कल्याणाचे चिंतन केले. म्हणून जगाने त्यांना ‘महात्मा’ म्हटले. ज्याचे मन विशाल असते तोच महात्मा असतो. प्राचीन ऋषीमुनींनी देखील विश्वकल्याणाची कामना व्यक्त केली आहे.


**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

---

जनमानस

# शास्त्रोक्त इतिहासाचे जनक : प्रा. कोसंबी

प्रा. दामोदर धर्मानंद कोसंबी हे एक आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गणितज्ञ आणि सांख्यिकीतज्ञच नव्हते तर ते एक इतिहासतज्ञ, प्राचीन भारत शास्त्र (इंडॉलॉजी) आणि संस्कृतचे गाढे अभ्यासक ही होते. प्रा. कोसंबी विशुद्ध गणित, सांख्यिकीशास्त्र, वांशिकीशास्त्र, नाणकशास्त्र, पुरातत्वशास्त्र, प्राचीन संस्कृत ग्रंथ, इतिहास आदी विविध विषयात मूलभूत संशोधन करणारे जगाच्या इतिहासातील एकमेवाद्वितीय संशोधक होते. इतिहासलेखनाच्या अभ्यासात त्यांनी गणित, सांख्यिकी, मार्क्सवाद आणि गंभीर विश्लेषण आणले. १९२९ च्या जागतिक मंदीमुळे लायक असूनही फेलोशिप न मिळाल्याने त्यांना संशोधक म्हणून पीएचडी करता आली नाही. तथापि संशोधनाचे त्यांचे कार्य आयुष्यभर चालूच राहिले. लॅटीन, ग्रीक, जर्मन, फ्रेंच, इटालियन आदी भाषा अवगत असणाऱ्या कोसंबी यांनी बॅलेस्टिक, अणुशक्ती, सौरशक्तीवर संशोधन केले असून औद्योगिक आणि शेतीच्या उत्पादनाच्या आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकी सल्लागार म्हणून चीनला भेट दिली. दामोदर धर्मानंद कोसंबी यांचा जन्म कोसबेन, गोवा येथे ३१ जुलै १९०७ रोजी आचार्य धर्मानंद कोसंबी आणि बाळाबाई यांच्या पोटी झाला. वडिलांकडून मिळालेल्या वारशामुळे ते जातपात, परंपरागत धर्म-रूढी यापासून दूर राहिले. त्यांच्या वडिलांनी अनेक हालअपेष्टा सोसत पुणे व काशी येथे संस्कृतचे अध्ययन केले.



कोसंबी हे हस्तीदंताच्या मनोऱ्यात बसून आपले विचार मांडणारे अभ्यासक नव्हते. जनसामान्यांच्या गरजा ओळखून त्यांच्या समस्या सोडवण्यावर त्यांचा भर असे. पावसाळ्याआधी तीन आठवडे टॉयफाईड रोखण्यास योग्य पावले उचलली गेली तर केवळ मुंबईत वर्षाला किमान पाचशे जीव वाचतील असं त्यांनी अभ्यासातून सिद्ध केलं होतं.तर मुंबई सरकारला त्यांनी शिफारस केली होती की नाणेघाट साठी महागडा रोप-वे तयार करण्याऐवजी सर्व ऋतुंमध्ये उपयोगी येईल असा रस्ता बांधण्यात यावा. भारताने अमेरिकेसोबत अणुकरार करून आपलं सार्वभौमत्व गहाण ठेवण्याच्या पन्नास वर्षाआधी ते ठामपणे म्हणाले होते, ’फक्त आधुनिक दिसावं म्हणून अणुऊर्जेवर पैसे उधळणं हे भारतासारख्या गरीब देशाला न परवडण्यासारखं आहे.’ त्याऐवजी भारतानं ऊर्जेचा दुसरा पर्याय म्हणून सौरऊर्जेवर भर द्यावा अशी भूमिका ते सातत्यानं मांडत होते. (म्हणूनच डॉ. होमी भाभा याच्याशी त्यांचे जमले नाही आणि त्यांनी टाटा मुलभूत संशोधन केंद्र सोडले.) त्यांनी भारतीय इतिहासाच्या संशोधनासाठी कार्ल मार्क्सवादी विचारसरणीचा वापर केला. भौतिक साधनांतील स्थित्यंतराची आणि त्या साधनांचा तत्कालीन जनजीवनाशी असलेल्या नात्यांची क्रमवार मांडणी म्हणजे इतिहास, या त्यांच्या वाक्यावरून हे लक्षात येतं. २९ जून १९६६ रोजी त्यांचे पुणे येथे हृदयविकाराने निधन झाले.

**- प्रा. विजय कोष्टी, सांगली.**

---



# - संतविचार -

डॉ. देविदास गुरव, सोलापूर

**‘मी मी म्हणता वाया गेले सर्व**
**पाहे तू अपूर्व नवल बापा**
**रावण नासला मी पणे गेला**
**रामे क्षय केला पुत्रपौत्री**
**मी पणे दुर्योधन बहुत गर्वीत**
**नासले जीवित रणांगणी**
**ऐसे ते बहुत मीपणे नासले**
**एका जनार्दनी भले मी पण रहित’**

संत एकनाथांचा हा अभंग म्हणजे आयुष्यभर ’मी’ पणाच्या गर्तेत वावरणाऱ्या मनुष्याच्या दृष्टीत झणझणीत अंजन घालणारे आहे. ’मी’ पणाची ही वावटळ बुद्धीला भ्रमीत करून दिशाहीनपणे भरकटवणारी ठरू शकते. परंतु संतविचार आणि संतवाणीमध्ये ’मी’पणाचा विकार घालवण्याची प्रचंड ताकद आहे. म्हणूनच संतविचार मानवी जीवन तारणारे आहे. नैतिक जीवन उन्नत करणारे आहे. त्याच उद्देशाने नाथ माउलींच्या अभंगाचे विवेचन करण्याचा प्रयत्न आहे.


’मी’पणा कुरवाळणे,’ मी’पणा मध्येच सारं आयुष्य घालवणे, सतत मी मी करत वावरणे, आपला अहंभाव उरी कवटाळून बसणे. हे सर्वथा अतिशय निरर्थक आहे. प्रापंचिकांनी समाजात व व्यवहारात वागताना विनम्र राहिले पाहिजे. ’मी’पणातच गुंतून राहिल्याने काय भोगावे लागते हे नाथांनी अनेक उदाहरणे देऊन सांगितले आहे. रावणाचा सर्वनाश, दुर्योधनाचा अंत आणि त्या पश्चात असे खूपजण ’मी’पणाच्या वणव्यात जळून नष्ट झाली. त्यावेळीही अशी अहंकारी प्रवृत्ती होती नि आजही ती मोठ्या स्वरूपात दिसून येत आहे. कुणाला धन संपत्तीचा, देहाचा अहंकार, कुणाला सौंदर्याचा, चातुर्याचा गर्व, कुणाला आपल्या बुद्धीचा, स्वतःच्या कर्तृत्वाचा अहंपणा असतो. परंतु सारे क्षणिक व हानिकारक असते. हे तो विसरतो. क्षणिक मोहाला बळी पडून मनातल्या

## ‘मी मी म्हणता वाया गेले सर्व’

अहंतेला जपत असतो. याची जाणीव

**’नाशिवंत देह, नाशिवंत माया**
**नाशिवंत छाया, वाया जैशी**
**मृगजळ परी, नाशिवंत धन**
**यासी तू भुलून गुंतलासी’**

या रचनेतून संत करून देतात. देह, माया आणि धन हे नाशिवंत आहे. त्यांच्या मागे धावणे म्हणजे मृगजळाच्या पाठी धावण्यासारखे आहे. एवढी धावाधाव करूनही हाती काही लागत नाही जीवनातील हे वास्तव नाथ माऊली आपल्यापुढे ठेवतात. जे चिरंतन आहे, जे शाश्वत आहे ते जाणून, समजून घेण्याचा प्रयत्न न करता मोह, माया व भौतिक सुखलोलुपतेला प्राधान्य देतो नि आयुष्य व्यर्थ गमावतो. त्याला वाटते आपण फार सुखी झालो. जीवनातील सारी सुखे माझ्या पायाशी लोळण घेत आहे.



त्याचा उपभोग घेणे माझा अधिकार आहे.’ मला आणखी पाहिजे, या लालसेपोटी इतरांच्या भावना पायदळी तुडवायलाही मागेपुढे पहात नाही. परंतु हव्यासने अहंकार वाढतो. ’मी’पणाचे भूत एकदा का मानगुटीवर बसले की त्याची परिणिती ’जैसी करणी वैसी भरणी’ अशीच होते. हे जेव्हा लक्षात येते तेव्हा वेळ निघून गेलेली असते. हाती पश्चात्ताप करण्याशिवाय काही नसते.म्हणून संतांनी ’वाउगा पसारा कारे वाढविला गव्हारा’ अशा उद्गारातून संतांनी वेळोवेळी आपले कान टोचले आहेत. इथे संत तुकोबांचा उपदेश आचरणात आणावा असा आहे.

**’उचित जाणावे मुख्य धर्म आधी**
**चित्त शुद्ध बुद्धी ठायी स्थिर**
**न घालावी धाव मनाचिया ओढी**
**वचन आवडी संताचिये**
**अंतरी या राहे वचनाचा विश्वास**
**न लगे उपदेश तुका म्हणे’**

आपले वर्तन आदर्श कसे ठेवावे, हे आवर्जून सांगतात. चित्त शुद्ध व बुद्धी स्थिर ठेवून विवेकाने वागणे महत्त्वाचे आहे. चंचल मनाच्या मागे न धावता संतांच्या वचनांवर, त्यांच्या वाणीवर विश्वास ठेवावा. संतवाणीवरचा विश्वास अंतः करणात दृढ राहिला तर त्यास उपदेशाची गरज लागणार नाही. कर्तव्य, नैतिक जीवन प्रणाली, सदाचरण, प्रपंचात राहूनही परमार्थ नि परमात्मा साध्य करता येते. शाश्वत आणि अशाश्वत याचे सतत स्मरण करून देणाऱ्या संतवाणीचे विस्मरण कधी होऊ देऊ नये एवढीच पंढरीरायाकडे प्रार्थना.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## ८०० चष्मे वाटप, ६०० जणांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया

# शिवसेनेच्या शिबिरात १६ हजार नागरिकांचा सहभाग

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर शहर शिवसेनेच्या वतीने आयोजित महाआरोग्य शिबीरास मोठा प्रतिसाद मिळला १६ हजार १०३ नागरिकांची तपासणी करण्यात आली. यामध्ये करण्यात आलेल्या नेत्र तपासणी मध्ये ८०० नागरिकांना चष्मे वाटप करण्यात आले तर ६०० नागिरकांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया केली जाणार आहे.**

मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे , आरोग्यमंत्री प्रा. तानाजीराव सावंत यांच्या राज्यातील जनतेच्या आरोग्याकरिता वेगवेगळ्या शिबिरातून शासनाच्या व शिवसेना पक्षाच्या माध्यमातून आरोग्य जपण्यासाठी उपाययोजना राबवित आहेत. त्याचाच एक भाग म्हणून शिवसेना सोलापूर संपर्क प्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांच्या नेतृत्वात शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवसेना संपर्क कार्यालय जवळ महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी ९ ते रात्री उशिर पर्यंत चालेल्या या शिबिरात शहरातील नागरिकांची आरोग्याची तपासणी करण्यात आली. यामध्ये बालरोग तपासणी, दातम कान, घसा, हांडाची, स्त्रीच्या विविध समस्याच्या तपासणी, त्वचा रोग, ई.सी. जी.शुगर, मेंदूच्या विविध तपासणी, रक्त तपासणी करण्यात आल्या तर नेत्र तपासणी झाल्यानंतर ८०० नागरिकांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले तर ६०० नागरिकांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया केली जाणार आहे.

या शिबरचा लाभ चौपाड,पत्रा तालीम, सळई मारुती ,अवंती नगर,निराळे वस्ती,अभिमान श्री नगर,यश नगर,उमा नगरी, मनोहर नगर,शहरातील मध्यमवर्गीय लोकवस्ती असलेल्या भागातील नागरिकांनी घेतला. या शिबीराचे उद्घाटन डॉ.सलगरकर, डॉ.सुहास करकमकर, डॉ.अग्रजा चिटणीस,डॉ यतीन जोग,डॉ,अभिजीत जगताप,डॉ.संपदा अन्वेकर,शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा शिवाजी सावंत ,संकेत पिसे, प्रदेश प्रवक्त्या डॉ.ज्योती वाघमारे ,उपजिल्हाप्रमुख हरिभाऊ चौगुले, शहर प्रमुख मनोज शेजवाल,शहर समनव्यक दिलीप कोल्हे,सुजीत खुर्द यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यासाठी आरोग्य विभागाची मोठी यंत्रणांना उभी करण्यात आली होती. जिल्हापरिषदेचे आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. लोहकरे यांचे मोठे सहकार्य लाभले.



# महापुरुषांचा अवमान करणाऱ्या भिडेंना अटक करा : आ. शिंदे

## शहर काँग्रेसच्या वतीने भर पावसात आंदोलन

सुराज्य/सोलापूर

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी आणि इतर महापुरुषांबद्दल अत्यंत अवमानकारक विधान करून त्यांचा अपमान करणाऱ्या संभाजी भिडे यांना त्वरित अटक करा अशी मागणी आमदार प्रणिती शिंदे यांनी केली.

मनोहर उर्फ संभाजी भिडे यांच्या विरोधात सोलापुर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने शहर अध्यक्ष चेतन नरोटे यांच्या नेतृत्वाखाली आमदार प्रणिती शिंदे यांच्या आणि प्रमुख नेतेमंडळी यांच्या उपस्थितीत राष्ट्रपिता महात्मा गांधी पुतळा रेल्वे स्टेशन समोर निदर्शने आंदोलन करून त्यांच्या प्रतिमेस जोडे मारुन निषेध करण्यात आला.

यावेळी बोलताना आमदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, संभाजी भिडे यांच्यासारख्या प्रवृत्तींना पुढे करून भाजप समाजात द्वेष निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी परदेशात महात्मा गांधींजींचा उदो उदो करतात देशात मात्र महापुरुषांबद्दल अवमानकारक व्यक्तव्य करणाऱ्यांना ते आणि भाजप नेहमीच पाठीशी घालतात. भाजप राजकिय स्वार्थासाठी अतिशय खालच्या पातळीवर जाऊन राजकारण करत आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीजी बद्दल बोलताना आपली लायकी तपासून पहावी महापुरुषांबद्दल अभिमान नसेल तर देश सोडून जावा त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करू नका. .




यावेळी शहरध्यक्ष चेतन नरोटे, कार्यध्यक्ष संजय हेमगड्डी, मा.नगरसेवक बाबा मिस्त्री, प्रवक्ते प्रा.अशोक निबंर्गी, प्रदेश सचिव मेकाले गुरुजी, मनिष गडदे, प्रवीण निकाळजे, विनोद भोसले, महिला अध्यक्ष प्रमिलाताई तूपलवंडे, युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे, अंबादास बाबा करगुळे, ब्लॉक अध्यक्ष देविदास गायकवाड, भटक्या विमुक्त विभाग अध्यक्ष भारत जाधव, प्रवक्ता सेल अध्यक्ष नागनाथ कदम, मिडीया सेल प्रमुख तिरुपती परकीपंडला, मध्य युवक काँग्रेस अध्यक्ष वाहिद बिजापुरे, सेवादल यंग ब्रिगेड अध्यक्ष विवेक कन्ना, रुपेश गायकवाड, कामगार सेल अध्यक्ष सायमन गट्टु, ग्राहक सेल अध्यक्ष वैभव पाटील, माजी महिला अध्यक्ष हेमाताई चिंचोळकर, दीनानाथ शेळके, आप्पा सलगर, अरुणा वर्मा, सुमन जाधव, राजेश झंपले, यांच्यासह इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# विद्यार्थी कमी आणि शिक्षक जास्त असलेल्या शाळा बंद करण्याचा मानस : आव्हाळे

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेच्या काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या खूपच कमी असून शिक्षकांची संख्या मोठी आहे. अशा सर्व शाळा बंद करून जवळच्या एक किलो मीटर परिसरात असणाऱ्या झेडपी शाळांना त्या जोडण्यात येणार असल्याचा प्रशासनाचा मानस असून त्यावर अद्याप निर्णय झाला नाही असे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी सांगितले.. विद्यार्थ्यांना शिकण्याची चांगली सोय व्हावी म्हणून एक किलोमीटर परिसराच्या जवळ असणाऱ्या मोठ्या शाळेत सोय करण्यात येईल. असेही त्यांनी सांगितले.



आव्हाळे यांनी आपले संपूर्ण लक्ष सध्या शिक्षण विभागावर केंद्रित केले आहे. नुकताच त्यांनी सोलापूर शहरातील जिल्हा परिषदेच्या शाळांना भेटी दिल्या. यामध्ये अनेक शाळेमध्ये वर्गखोल्या धोकादायक अवस्थेत दिसून आल्या. तसेच काही शाळेमध्ये शिक्षक संख्या जास्त आणि पटसंख्या कमी प्रमाणात होती.

जिल्हा परिषद दरवर्षी शिक्षण विभागासाठी वर्ग खोल्या दुरुस्ती आणि नव्याने बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च करते .परंतु या बांधकामाची क्वालिटी तपासली जात नाही. जिल्ह्यातील सुमारे २७०० जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये अनेक ठिकाणी वर्ग खोल्या धोकादायक अवस्थेत आहेत.

त्याच्या दुरुस्तीवर आम्ही लक्ष केंद्रित केले आहे. अशा धोकादायक शाळांचे स्ट्रक्चर ऑडिट करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यापुढे जिल्हा परिषद शाळांच्या बांधकामांमध्ये कोणताही हलगर्जीपणा खपवून घेणार नाही .असा इशारा त्यांनी दिला.

# अश्विनी रुग्णालयामध्ये न्यूरो रिहॅबिलिटेशन केंद्राचे उद्घाटन

सुराज्य/सोलापूर

आरोग्य सेवेत अग्रस्थानी असलेल्या अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित, सोलापूरने नविन न्यूरो रिहॅबिलिटेशन सेंटरची उभारणी केली असून, जागतिक किर्तीचे मेंदूरोग तज्ञ डॉ. निर्मल सूर्या, मुंबई यांच्या हस्ते रविवारी या केंद्राचे उद्घाटन झाले.



या उद्घाटन कार्यक्रमानिमित्त सकाळी रुग्णालयाच्या सेमिनार हॉलमध्ये तज्ञ डॉक्टरांसाठी मेंदूरोग तज्ञ डॉ.निर्मल सूर्या यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

तद्नंतर अश्विनी सहकारी रुग्णालयाच्या नवीन इमारतीमध्ये उद्घाटन समारंभ पार पडला. यावेळी उपस्थितांचे स्वागत वैद्यकिय अधिक्षक डॉ. राजेंद्र घुली यांनी केले. रुग्णालयाचे मेंदूरोग तज्ञ डॉ. प्रीतेश अग्रवाल यांनी डॉ. निर्मल सूर्या यांचा परिचय व माहिती उपस्थितांना दिली.

यावेळी डॉ. निर्मल सूर्या यांनी सांगितले की, न्यूरो रिहॅबिलिटेशन सेंटर ही काळाची गरज आहे, आजारामुळे दुर्लक्षित असलेल्या रुग्णांना न्यूरो रिहॅबिलिटेशन सेंटरमधील उपचारामुळे स्वावलंबी बनविणे हे प्रमुख उद्देश आहे. संपूर्ण भारतामध्ये न्यूरो रिहॅबिलिटेशनची संख्या कमी असून अश्विनी रुग्णालयाचे हे सेंटर भारतातील ४ थे सेंटर आहे. रुग्णालयाचे चेअरमन बिपीनभाई पटेल यांच्या हस्ते डॉ.निर्मल सूर्या या सत्कार करण्यात आला. रुग्णालयाचे वैद्यकिय उपअधिक्षक डॉ.प्रशांत औरंगाबादकर यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी न्यूरो फिजिओथेरपीस्ट सौ.मनीषा तळपल्लीकर यांनी सूत्रसंचालन केले.

या कार्यक्रमास संस्थेचे ज्येष्ठ संचालक डॉ.विजय पाटील, श्री.चंद्रशेखर स्वामी, श्री.वेणुगोपाळ तापडीया, श्री.जयेशभाई पटेल, श्री.मेहूल पटेल, श्रीमती यशोदाबाई डागा, श्री.अशोक लांबतुरे, श्री.विलास पाटील आणि डॉ. सिध्देश्वर रुद्राक्षी, डॉ. विद्यानंद चव्हाण उपस्थित होते.

सदर कार्यक्रमास वैद्यकीय अधिक्षक डॉ.राजेंद्र घुली, वैद्यकीय उपअधिक्षक डॉ.प्रशांत औरंगाबादकर, प्रशासकीय अधिकारी श्री.सचिन बिज्जरगी, मेंदूरोगतज्ञ डॉ.प्रीतेश अग्रवाल, डॉ.शंतनू गुंजोटीकर, न्यूरो फिजिओथेरपीस्ट डॉ.सौ. मनीषा तळपल्लीकर, डॉ.सौ. राधिका क्षीरसागर, डॉ. संकेत हरहरे, डॉ. जेसिका ऍन्थोनी आणि इतर मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी तज्ञ डॉक्टर्स, अधिकारी, कर्मचारीवर्ग, रुग्ण व नातेवाईक उपस्थित होते.

## अध्यक्षपदी विजया माळी यांची निवड

**सोलापूर :** माळी महासंघ उत्तर सोलापूर तालुका महिला आघाडी च्या तालुका अध्यक्ष पदी वडाळा येथील कार्यकर्त्या सौ विजयाताई विजय माळी यांची निवड जाहीर करणेत आली आहे . आगामी एक वर्षा करीता ही निवड करण्यात आली आहे. माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर जांभळे यांनी त्यांची निवड जाहीर केली आहे. माळी महासंघाचे राष्ट्रिय अध्यक्ष अविनाश ठाकरे , प्रदेश अध्यक्ष अरुण तिखे, माळी महासंघ महाराष्ट्र राज्य किसान आघाडी चे प्रदेश अध्यक्ष शंकरराव वाघमारे , डॉ. पोपट माळी यांच्याशी चर्चा करून ही निवड करण्यात आली आहे.

निवडी बद्दल अविनाश ठाकरे , प्रदेश अध्यक्ष अरुण तिखे , शंकरराव वाघमारे, भारत माळी , माळी महासंघाचे सचिव चंद्रशेखर दरवडे , शाम गोडसे, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश राऊत, माढा तालुका अध्यक्ष बालाजी राऊत , सागर दादा वाघमारे , संतोष माळी , सौ वंदना देवकर , सौ मनीषा भानवसे , सौ स्मिता जांभळे आदींनी त्यांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहेत.

## धर्मपुरीत बांधाच्या कारणावरून मारहाण पिता-पुत्र जखमी

**माळशिरस :** धर्मपुरी तालुका माळशिरस येथे शेतातील बांधाच्या कारणावरून काठी आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत श्रीकांत धनाजी शिंदे (वय २९ ) आणि त्याचे वडील धनाजी निवृत्ती शिंदे (वय ६८ दोघे रा. धर्मपुरी) हे जखमी झाले.

ही घटना शनिवारी सकाळच्या सुमारास त्यांच्या घराजवळ घडली. त्यांना नातेपुते येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. हनुमंत गावडे, शुभम गावडे आणि गणेश गावडे या तिघांनी मिळून त्यांना मारहाण केली . अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

# लोकमंगल शिक्षकरत्न आणि आदर्श शाळा पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

सुराज्य/सोलापूर

लोकमंगल फाऊंडेशन आणि लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्या जाणाऱ्या या शिक्षकरत्न पुरस्कारासाठी सोलापूर जिल्ह्यातील सर्व स्तरावरील शिक्षकांकडून अर्ज मागवण्यात येत आहेत.

किमान १२ वर्षे सेवा झालेल्या प्राथमिक, माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालयीन वरिष्ठ महाविद्यालयीन क्रीडा आणि कलाशिक्षकांना या पुरस्कारांसाठी अर्ज करता येतील. उपलब्ध होणाऱ्या प्रवेशिकातून प्राथमिक, माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालयातल्या प्रत्येकी दोघांना पुरस्कार दिले जातील वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक, कला शिक्षक किंवा क्रीडा शिक्षक प्रत्येकी एक अशा एकूण आठ शिक्षकांना पुरस्कार दिले जातील.

शिक्षक म्हणून सेवा करताना ज्यांनी विशेष उल्लेखनीय उपक्रम राबविले असतील किंवा अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर केला असेल अशा एका शिक्षकालाही पुरस्कार दिला जातो. शिवाय एखाद्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणा-या गुणवंत विद्यार्थ्यांच्या शिक्षकाला डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. शिक्षकरत्न पुरस्कार योजनेत १० शिक्षकांना पुरस्कार दिले जातात. अडीच हजार रुपयांची पुस्तके आणि सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

सोलापूर जिल्हयातल्या जिल्हा परिषदेच्या दोन प्राथमिक शाळांनाही पुरस्कार देऊन सन्मानित केले

जाणार आहे. विहित नमुन्यातले अर्ज लोकमंगल फाऊंडेशनच्याwww. lokmangalfoundation.com संकेत स्थळावर उपलब्ध असतील विहित नमुन्यातील संपूर्ण अर्ज भरून अन्नपूर्णा १३/अ. सहयाद्री नगर, जुना होटगी नाका, सोलापूर येथे सादर करवेत. अर्ज भरण्याची अंतिम तारीख २५ ऑगस्ट २०२३ पर्यंत आहे. प्रस्ताव फाईल ऑफिसला आणून द्यायच्या आहेत. अधिक माहितीसाठी फोन क्रमांक ०२१%- २६०६०७०/०२१७-२७३५५३३ आणि ९६५७७०९७१० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन लोकमंगल फाऊंडेशन च्या वतीने करण्यात आले आहे.

# भगीरथ भालकेंची बीआरएसच्या पुणे सहसमन्वयकपदी नियुक्ती

सुराज्य/सोलापूर

भारत राष्ट्र समितीमध्ये प्रवेश केलेले पंढरपूरमधील विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष भगीरथ भालके यांच्यावर पक्षाने संघटनात्मक जबाबदारी सोपवली आहे. भालके यांच्याकडे पुणे विभागाचे सहसमन्वयकपद देण्यात आले आहे. बी. जे. देशमुख हे पुण्याचे समन्वयक असणार आहेत. त्यांच्याबरोबर भालके हे काम पाहणार आहेत.



भारत राष्ट्र समितीचे राष्ट्रीय सरचिटणीस हिमांशू तिवारी यांनी पक्षाची राज्य कार्यकारिणी जाहीर केली आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील विभागानुसार पदांचे वाटप करण्यात आले आहे. या कार्यकारिणीवर महाराष्ट्रातील पक्ष विस्ताराची जबाबदारी असणार आहे. तशा सूचना त्यांना देण्यात आलेल्या आहेत.

पुणे प्रादेशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक म्हणून काम केलेले बी. जे. देशमुख यांनीही बीआरएसची वाट धरली आहे. त्यांच्याकडे पक्षाने पुणे विभागाचे समन्वयक म्हणून जबाबदारी सोपवली आहे. त्यांच्या जोडीला राष्ट्रवादी काँग्रेसमधून आलेले भगीरथ भालके सहसमन्वयक म्हणून काम करणार आहेत.

# अजित पवार गटाच्या ग्रामीण युवक जिल्हाध्यक्ष पदासाठी दहाजण आखाड्यात

## शक्तीप्रदर्शन करत दिल्या मुलाखती, प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांचे जंगी स्वागत

सुराज्य/सोलापूर

अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस सोलापूर जिल्हा ग्रामीण युवक अध्यक्ष पदासाठी रविवारी युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण सोलापूर दौऱ्यांवर आले होते, शासकीय विश्रामगृह येथे इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या. यावेळ दहा जणांनी ग्रामीण युवक जिल्हाध्यक्ष पदासाठी मुलाखती देत मोठे शक्तीप्रदर्शन केले. युवक प्रदेशाध्यक्ष यांचे सोलापूरात जंगी स्वागत लरत क्रेनच्या सहाय्याने भला मोठा हार घालत स्वागत केले.

राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश अध्यक्ष सुरज चव्हाण यांच्या नियुक्ती नंतर प्रथमच सोलापूर शहर जिल्हाच्या दौऱ्यावर होते. सोलापूर शहर आणि जिल्हयातील पदाधिकारी कार्यकर्त्यांनी जल्लोषात स्वागत केले. शहर सरचिटणीस खलिल शेख यांनी हलगी कडकडाट गुलाब



पाकळ्यांची उधळन करत क्रेनच्या माध्यमातून भला मोठा हार घालून सत्कार केला. यानंतर प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण जिल्हा ग्रामीण युवक अध्यक्ष पदासाठी मुलाखती घेतल्या. यावेळी

प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील , प्रदेश सचिव संतोष पवार , सोलापूर जिल्हा सरचिटणीस लतीफ तांबोळी, युवक अध्यक्ष जुबेर बागवान, सुहास कदम, वसीम बुरान, प्रांतिक सदस्य महेश निकंबे, आनंद मुस्तारे, अमीर शेख, खलिल शेख प्रमोद भोसले, अनिल बनसोडे , युवराज माने ,सोमनाथ शिंदे, बसू कोळी तनवीर गुलजार, इरफान शेख, सर्फराज बागवान, नागेश निंबाळकर, आशुतोष नाटकर, प्रसाद कलागते, शामराव गांगर्डे , रुपेश भोसले, चेतन गायकवाड युवराज राठोड, बंटी यमपुरे, सिध्देश्वर आंबट, अनिल उकरंडे, संजय पाटील, प्रकाश जाधव ,राजू बेळेनौर ,संजय मोरे, अहमद मसुलदार, रमीज कारभारी, शशिकला करपटे, मोनिका सरकार, कविता पाटील, किरण मोहिते, चित्रा कदम ज्योती शटगार, यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

युवक प्रदेश अध्यक्ष सुरज चव्हाण यांचे राष्ट्रवादी युवक प्रदेश सरचिटणीस चेतन गायकवाड स्वागत केले. केगाव, बाळे येथून शासकीय विश्रामगृहा पर्यंत युवकांची मोटार सायकल रॅली काढली. चव्हाण यांचे पुष्पहार, ग्रामदैवत सिद्धरामेश्वराची प्रतिमा भेट देऊन सत्कार केला. यावेळी माजी गटनेते किसन जाधव, नागेश गायकवाड, ,फिरोझ पठाण,दयानंद जाधव राष्ट्रवादी अल्पसंख्यांक शहर उपाध्यक्ष किरण शिंदे, अमोल जगताप,दस्तगीर पटेल, समर्थ माशाळकर, माऊली जरग,प्रथमेश पवार वसंत कांबळे, माणिक कांबळे, महादेव राठोड उपस्थित होते

### युवक अध्यक्ष पदासाठी इच्छुक

संदीप मांडवे (पंढरपूर) ,अभिषेक अव्हाड (करमाळा), अक्षय भांड (नातेपुते), युवराज राठोड (दक्षिण सोलापूर ), सुमित गायकवाड ( पंढरपूर), जयदीप साठे (उत्तर सोलापूर ),अश्फाक जमादार ( करमाळा ), रमिज मुल्ला ( अक्कलकोट ), श्रीकांत शिंदे (पंढरपूर)

# जिल्हा परिषदेचे पशुसंवर्धन खाते राज्याकडे वर्ग होणार

## शासनाचे आकृतीबंध प्रणाली धोरण सुरू

✔ सुराज्य/सोलापूर

**सुरुवातीपासून जिल्हा परिषदेच्या देखरेखी खाली चालत आलेले पशुसंवर्धन खाते लवकरच राज्याकडे वर्ग करण्यात येणार आहे. शासनाच्या आकृतीबंध प्रणाली धोरणामुळे सध्या राज्यभरातील सर्व पशुसंवर्धन विभाग राज्याकडे वर्ग करण्यात येणार आहेत .त्यामुळे जिल्हा परिषदेचे पशुसंवर्धन विभाग लवकरच लोप पावणार असल्याचे अधिकृत सूत्राकडून सांगण्यात आले.**



पशुसंवर्धन विभागाकडे राज्य शासनाच्या व केंद्र सरकारच्या अनेक योजना सुरू आहेत. मात्र गेल्या आठ दहा वर्षांपासून यातील जवळपास ८० ते ९० टक्के योजना या स्टेट ला या पूर्वीच जोडण्यात आल्या आहेत. त्यामुळे. जि प कडील पशुसंवर्धन विभागातील योजना बंद होत असल्याने कार्यालयीन कामाचा भार कमी झाला आहे. त्याचबरोबर कार्यालयीन कर्मचारी, डॉक्टर, पशुधन पर्यवेक्षक, सहाय्यक पशुसंवर्धन विकास अधिकारी, पशुधन विकास अधिकारी कुकुट ,पशुधन विकास अधिकारी तालुका, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी हे सर्व कर्मचारी पंचायत समिती स्तरावर काम करतील. परंतु याची देखरेख सर्व स्टेट कडे राहणार आहे.

सध्या मुख्यालयात श्रेणी एक चे १२० अधिकारी श्रेणी दोन चे १८३ अधिकारी आहेत. तर जिल्ह्यात पशुसंवर्धन दवाखाने २०३ इतके आहेत. हे सर्व पंचायत समिती स्तरावर लवकरच वर्ग करण्यात येणार आहेत. हे सर्व कर्मचारी सध्या पंचायत समिती स्तरावर जिल्हा परिषदेच्या देख रखे खाली जरी काम करत असले तरी यापुढे स्टेट कडे वर्ग केल्यानंतर स्टेटचे सर्व कर्मचाऱ्यांवर कमांड राहणार आहे. तसेच सध्या मुख्यालयात एकूण मंजूर कर्मचारी ३४० इतके असून त्यापैकी भरलेली पदे २५६ इतकी आहेत.

रिक्त पदे ही ९३ आहेत. हा विभाग स्टेट कडे लवकरच वर्ग केला जाणार असल्याचे अधिकृत सूत्राकडून सांगण्यात आले. त्यामुळे रिक्त पदे भरली गेली नसल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच शासनाचे आकृती बंद प्रणाली कार्यक्रम राज्यभर सध्या सुरू असून या आकृतीबंध प्रणालीमध्ये शासनाची त्या त्या विभागाची सर्व कार्यालय एकाच ठिकाणी असावेत असा शासनाचा माणूस असल्याने यापुढील काळात पशुसंवर्धन ची इतर कार्यालय स्टेट कडे एकाच ठिकाणी कार्यरत असतील असे शासनाचे नियोजन चालू असून लवकरच हे कार्यालय स्थलांतरित होणार असल्याचे अधिकृत सूत्राकडून सांगण्यात आले .

# अक्कलकोट तालुक्यातील १३१ गावात महसूल दिन

✔ सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यात १० महसूल मंडळे अंतर्गत १३१ गांवे असून १ ऑगस्ट 'महसूल दिन पासून' महसूल सप्ताह' दि. १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट पर्यंत साजरा करण्यात येणार आहे, अशी माहिती तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांनी दिली.



१ ऑगस्ट महसूल दिन साजरा करणे, २ ऑगस्ट युवा संवाद, ३ ऑगस्ट एक हात मदतीचा, ४ ऑगस्ट जनसंवाद, ५ ऑगस्ट सैनिक हो तुमच्यासाठी, ६ ऑगस्ट महसूल संवर्गातील कार्यरत/सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी संवाद, ७ ऑगस्ट महसूल सप्ताह सांगता समारंभ होणार आहे.

याद्वारे १ ऑगस्ट महसूल दिन साजरा करणे व महसूल सप्ताह शुभारंभात उत्कृष्ट अधिकारी कर्मचारी यांचा गौरव, जमीन महसूल प्रकरणे ई हक्क पोर्टलवर तलाठयामार्फत सेतु सुविधा केंद्रामार्फत नोंदवणे, २ ऑगस्ट युवा संवाद अंतर्गत दहावी व बारावी उत्तीर्ण विद्दयार्थ्यांना जात, अनाथ सह विविध दाखले प्रमाणपत्रांचे वितरण व विविध शिष्यवृत्ती माहिती, ३ ऑगस्ट एक हात मदतीचा यामध्ये पुर्व मान्सुन व मान्सुन कालावधीत बाधित नागरिकांना देय असलेल्या

सोई सुविधा, नुकसान भरपाई, ४ ऑगस्ट जनसंवाद मध्ये महसूल अदालतींचे आयोजन, ५ ऑगस्ट सैनिक हो तुमच्यासाठी यामध्ये संरक्षण दलातील अधिकारी, सैनिक यांना व त्यांच्या कुंटुंबियांना आवश्यक दाखले, ६ ऑगस्ट महसूल संवर्गातील कार्यरत/सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी संवाद मधुन अडचणी सोडवणे व ७ ऑगस्ट महसूल सप्ताह सांगता समारंभ होणार आहे.

सर्व नागरीकांनी सदर महसूल सप्ताह यांचा लाभ घेऊन प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. २ विठ्ठल उदमले यांचे मार्गदर्शनाखाली अक्कलकोटचे तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांनी केले आहे.

## रिक्षात झोपल्या ठिकाणी ड्रायव्हरचा मृत्यू

सोलापूर - मध्यरात्री घराजवळ रिक्षात झोपलेल्या रिक्षा चालकाचा हृदयविकाराच्या झटक्याने ने मृत्यू झाला . ही घटना जुळे सोलापुरातील सुभाष नगरात रविवारी पहाटेच्या सुमारास घडली. दिनकर मधुकर ढाकणे (वय ३५ रा. सुभाष नगर, जुळे सोलापूर) असे मयत झालेल्या रिक्षा चालकाचे नाव आहे. ते शनिवारी रात्री रिक्षा व्यवसाय करून मध्यरात्री घरी आले होते. त्यानंतर रिक्षा घरासमोर लावून रिक्षातच झोपले होते. पहाटे दोन वाजेच्या सुमारास त्यांची पत्नी गीतांजली यांनी त्यांना उठवण्याचा प्रयत्न केला. मात्र ते बेशुद्ध अवस्थेत आढळले. त्यांना त्वरित सुधाकर (भाऊ) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले असता ते पहाटेच्या सुमारास मयत झाले. मयत दिनकर ढाकणे यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.

## राजेश्वरी नगरात चोरट्याने फोडले घर

✔ **सोलापूर** : बंद घराचा काडी-कोयंडा उचकटून अज्ञात चोरट्याने घर फोडून घरातील मुद्देमाल चोरून नेल्याची घटना दि.२६ ते २८ जुलै दरम्यान राजेश्वरी नगर सिद्धारूढ मठाजवळ जुळे सोलापूर येथे घडली.याप्रकरणी मयंक काश्यप्पा बोळकुद्दे (वय-२२,रा.पद्मा नगर,न्यू पाच्छा पेठ) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.फिर्यादी यांचे मित्र रघुनाथ पाठक (वय-३७,रा. राजेश्वरी नगर) यांच्या बंद घराचा काडी-कोयंडा उचकटून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून घरातील सोने व चांदीचे दागिने चोरून नेले आहे.तसेच घरमालक आल्यानंतर मुद्देमालाची माहिती देणार असल्याचे फिर्यादित म्हटले आहे.घटनेचा पुढील तपास पोसई गायकवाड हे करीत आहेत.

## अज्ञात चोरट्याने दुचाकी पळवली

✔ **सोलापूर** : राजेंद्र चौक येथील बी. वाय टेलरच्या कारखान्यासमोरील रस्त्यावर पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच १३ डीएफ ८००४ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना २८ जुलै रोजी सकाळी साडेअकरा ते सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी गुरलिंगप्पा हणमंत बकुर्गी (वय-४२, रा. जुना विजापूर नाका, रेवणसिद्धेश्वर नगर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल राठोड हे करीत आहेत.

## हिवरेतील शेतातून दीड लाखांच्या जर्सी गाई गायब

✔ **सोलापूर** : मोहोळ तालुक्यातील हिवरे गावात राहणाऱ्या सागर विजय निचळ यांच्या शेतातून चोरट्याने २ जर्सी गाई आणि १ वासरू असा १ लाख ३५ हजार रुपये किमतीची जनावरे चोरून नेली. ही चोरी २३ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास घडली. चोरट्याने निचळ यांच्या शेतात बांधलेले तिन्ही जनावरे चोरून नेले. अशा आशयाची फिर्याद त्यांनी मोहोळ पोलिसात दाखल केली. पुढील तपास हवालदार क्षीरसागर करीत आहेत .

## माहेरून पैसे आण म्हणून विवाहितेस मारहाण

सोलापूर - माहेरून पैसे आण म्हणून पती आणि सासरे या दोघांनी मिळून फायबरची काठी आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत २८ वर्षीय विवाहिता जखमी झाली. ही घटना कुमठा नाका परिसरातील महाराणा झोपडपट्टी येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली . पिंकी धनंजय चौधरी (वय २८ रा. महाराणा झोपडपट्टी) असे जखमीचे नाव आहे. तिला उपचारासाठी संतोष (भाऊ) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले. आज सकाळी नऊ वाजेच्या सुमारास तिला आई-वडिलांकडून पैसे आण म्हणून पती धनंजय चौधरी आणि सासरे या दोघांनी मारहाण केली. अशी नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे .

## दुकान फोडून रकमेसह साहित्य पळवले

✔ सुराज्य/सोलापूर

अज्ञात चोरट्याने दुकान फोडून दुकानातील रक्कमसह साहित्य चोरून नेल्याची घटना दि.२८ ते २९ दरम्यान रूपा भवानी मंदिर पाणी गिरणी समोर सोलापूर येथे घडली. याप्रकरणी राजेश किसनराव झिंगाडे (वय-४५,रा.भवानी पेठ,सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांचे रूपाभवानी पाणी गिरणी समोर असणारे यश एंटरप्राइजेस नावाचे सिमेंट स्टीलच्या दुकानाच्या लोखंडी शटरला लावलेले कुलूप तोडून दुकानात प्रवेश केला.त्यानंतर दुकानातील आठ हजार सातशे रुपये रोख रक्कम, लॅपटॉप बॅग, इलेक्ट्रिक चार्जर बॅटरी, मिक्सर कटर,काळ्या रंगाची सॅक असा ऐवज चोरून नेला आहे. असे फिर्यादीत म्हटले आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल शिवशरण हे करीत आहेत.

## सेतू अभिवाचन मंचातर्फे नूर-ए- अख्तरी

✔ सुराज्य/सोलापूर



'नूर-ए-अख्तरी' ही संगीतमैफल श्री. हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या डॉ. वा. का. किर्लोस्कर सभागृहात शनिवार दि. २९ जुलै रोजी सायंकाळी रंगली.

पुण्याच्या सेतू अभिवाचन मंचाने हा कार्यक्रम सादर केला होता. गझल, ठुमरी, दादरा यांच्या माध्यमातून गझल सम्राज्ञी बेगम अख्तर यांचा जीवनपट उलगडण्यात सोलापुरच्या पूर्वाश्रमीच्या श्रुति विश्वकर्मा सध्याच्या श्रुति मराठे यांच्या सुरेल दर्दभ-या गायनाचा फार मोठा वाटा होता. संदीप मिश्रा यांची सारंगीची दुर्मीळ होत चाललेली साथ रसिकांचे कान तृप्त करणारी होती. गीतांजली जोशी यांची हिन्दी-मराठी यांचे बेमालूम मिश्रण असलेली संहिता काळजाचा ठाव घेणारी होती. दीपाली दातार यांचे वाचनही परिणामकारक होते. स्वानंद कुलकर्णी यांची हार्मोनियम आणि विनायक कुडाळकर यांचा तबला यांच्या साथीने ही कार्यक्रमाची रंगत चढत गेली. अनिरुद्ध दडके यांचे दिग्दर्शन लाभलेल्या या अप्रतिम कार्यक्रमाला सोलापूरच्या रसिकांनी भरभरून दाद दिली.

या कार्यक्रमासाठी संगणक तज्ज्ञ व प्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले व समाजकार्यकर्त्या व लेखिका मुक्ता मनोहर आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायमूर्ती साधना जाधव- हिरेमठ या परगावाहून मुद्दाम आल्या होत्या. साधनाताईंनी वाचनाल्याला कलेच्या व ज्ञानाच्या विविध क्षेत्रातल्या थोर स्त्रियांची चरित्रे भेट दिली. वाचनालयाचे प्रमुख कार्यवाह डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी ती स्वीकारली. श्रोतृवर्गात आनंद बदामीकर, हेमकिरण पत्की, गोविंद दाते, प्रशांत देशपांडे, नागेश भोसेकर डॉ. सुहासिनी शहा, विद्या लिमये, संध्या जोशी आदि कलावंत व रसिक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. श्रीकांत कामतकर यांनी केले. प्रा. सुलभा पिशवीकर यांनी कलावंताचा परिचय करून दिला. प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्या हस्ते कलावंताचा सत्कार करण्यात आला.

## समान नागरी कायदा या विषयावर मंगळवारी व्याख्यान

✔ **सोलापूर** : अखिल भारतीय अधिवक्ता परिषद सोलापूर जिल्हा शाखेच्यावतीने मंगळवारी (दि. १) सायंकाळी ६.३० वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात समान नागरी कायदा या विषयावर व्याख्यान होणार आहे. स्व. रंगनाथ विष्णू लळीत वकील व्याख्यानमालेअंतर्गत यंदा बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाचे उपाध्यक्ष ड. डॉ. उदय वारुंजीकर हे 'समान नागरी कायदा' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. व्याख्यानमालेचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश उदय लळीत यांच्या हस्ते होईल.

सध्या समान नागरी कायदा या विषयावर देशभरात मोठी चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय अधिवक्ता परिषद सोलापूर शाखेतर्फे या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. सोलापूरकरांनी या अभ्यासपूर्ण मांडणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अखिल भारतीय अधिवक्ता परिषदेचे शहर अध्यक्ष ड. महेश अग्रवाल आणि जिल्हाध्यक्ष ड. धनंजय माने यांनी केले आहे.



## जुनोनीत 'टिफीन बैठक विथ मन की बात' कार्यक्रम

✔ सुराज्य/सांगोला

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारने केवळ नऊ वर्षांत देशाचा संपूर्ण कायापालट केला आहे. भाजपाच्या काळात सुरू झालेले बहुतांश प्रकल्प विक्रमी वेळेत पूर्ण झाले. अनेक प्रकल्प आणि विकासकामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. देशांतर्गत रस्ते, पूल यांचे जाळे निर्माण झाले आहे.

दळणवळण गतिमान झाले आहे. पंतप्रधान मोदी यांनी आपली संपूर्ण हयात लोकांच्या सेवेत वाहिली असून गेली नऊ वर्षे त्यांनी देशासाठी समर्पित केली आहेत. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील भाजप सरकार देशात समता निर्माण करण्याच्या आपल्या वचनबद्धतेवर ठाम आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या नऊ वर्षांत शाश्वत आणि सर्वसमावेशक विकास केला असून देश प्रगतिपथावर घोडदौड करत असल्याचे मत भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी व्यक्त केले. भारतीय जनता पक्षाच्या वतीने मोदी ९ महाजनसंपर्क अभियाना अंतर्गत जुनोनी ता.सांगोला येथे मीटिंग विथ टिफीन बैठक आणि मन की बात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत बोलत होते. यावेळी माजी सभापती संभाजी आलदर, शिवाजीराव गायकवाड, दुर्योधन हिप्परकर, शिवाजी घेरडे, भाऊसो पाटील, राहुल हिप्परकर, नारायण बजबळे, विलास व्हनमाने, मोहन बजबळे, सोमा कर्चे, विशाल गाडे, भगवान हिप्परकर, रवी खंडागळे, विजय खटके, गंगाराम वाघे, महेश व्हनमाने, सतीश गुरव, भिमराव खरात, समाधान कांबळे, महेश गुरव, विनोद उबाळे, बाळासाहेब चव्हाण यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## नाट्य परिषदेच्या रंगवर्धन उपक्रमात 'सुरमयी शाम'

✔ सुराज्य/सोलापूर

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूरच्या वतीने सुरू असलेल्या रंगवर्धन या उपक्रमात मोदी येथील स्व.पद्माकर देव सभागृहात स्वरसम्राट स्व.मोहम्मद रफी यांच्या ४३ व्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून सुरमयी शाम हा डॉ.राजीव मोहोळकर यांच्या गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

डॉ. मोहोळकर यांच्याकडून मोहम्मद रफी यांच्या अविट गोडीच्या गाण्यांची मैफिल ऐकताना रसिक मंत्रमुग्ध झाले होते. 'तेरी आखो के सिवा दुनिया मे रखा क्या है', 'तेरी गलियो मे ना रखेंगे कदम', 'आने से उसके आये बहार', 'मुझे कितना प्यार है तुमसे', 'मै एक राजा हू', अशा जुन्या चित्रपटातील स्वर्गीय मोहम्मद रफींनी गायलेली एकापेक्षा एक सुमधुर गाण्यांची बरसात झाली.

प्रारंभी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार यांच्या हस्ते डॉ.राजीव मोहोळकर व निवेदिका रश्मी मोहोळकर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सोलापूरचे ज्येष्ठ कवी रा.ना पवार यांना १०२ व्या जयंतीनिमित्त नाट्य परिषदेच्या वतीने आदरांजली वाहण्यात आली तर नटसम्राट ज्येष्ठ अभिनेते जयंत सावरकर यांच्या निधनाबद्दल त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ कार्यकारणी सदस्य पद्माकर कुलकर्णी यांनी केले तर आभार किरण फडके यांनी मानले.

या कार्यक्रमास नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार, उपाध्यक्ष अशोक किल्लेदार, प्रमुख कार्यवाह प्रा.जोतिबा काटे, सहकार्यवाह सुमित फुलमामडी, कार्यकारणी सदस्य व्यंकटेश रंगम, हिरालाल धुळम, रवी मोहोळकर, संगमेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य प्रा.अन्यापणावार, गितेश चुळभरे, यांच्यासह नाट्य परिषदेचे पदाधिकारी आणि नाट्य रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इब्राहिम शेख यांचे निधन

✔ **अक्कलकोट** : तालुक्यातील गळोरगी येथील इब्राहिम



करीम शेख यांचे वृध्दापकाळाने निधन झाले आहे. ते १०७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात सहा मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, असा परिवार आहे. सोमवारी गळोरगी येथे दुपारी १ वा. त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. ते सरपंच अशरफबी शेख व दुधनी बाजार समितीचे संचालक वहिदपाशा शेख यांचे वडिल होते.

## शालन खरात यांचे निधन



✔ **सोलापूर** : चौपाड येथील रहिवासी शालन गणपत खरात यांचे शनिवारी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी त्या ६८ वर्षांच्या होत्या. शनिवारी रात्री त्यांच्यावर पुणे नाका स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सूना, नातवंडे असा परिवार आहे.

### दिलीपराव माने यांच्या वाढदिवसानिमित्त स्पर्धा

# मॅरेथॉन स्पर्धेत ७,१२५ स्पर्धकांचा सहभाग

✔ सुराज्य/सोलापूर

माजी आमदार दिलीप माने यांच्या वाढदिवसानिमित्त गौरव समितीने आयोजित केलेल्या मॅरेथॉन स्पर्धेत तब्बल ७ हजार १२५ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला माजी आमदार दिलीप माने यांच्या हस्ते करण्यात आले.

जयश्री माने, माजी नगरसेवक नागेश ताकमोगे, भारत जाधव,श्रीकांत मोरे,पोलीस निरीक्षक राजकुमार वाघचवरे, शिवाजी बचुटे, सिद्राम खेडगीकर,डॉ. वेलनकर, शैलजा राठोड, ॲड. बापू देशमुख, पांडुरंग चौधरी, हाजीमलंग नदाफ, आण्णाराव भोपळे, लताताई जावीर, अंतु देठे, शाम पाटील, सचीन चौधरी, श्रीकांत मेलगे पाटील, महेश घाडगे, अनिल हिबारे, प्रदीप सुरवसे, राजु बगाडे उपस्थित होते.

गौरव समितीने यावेळी क्रिकेट खेळाडूसाठी आयपीएल धर्तीवर क्रिकेट स्पर्धा, महिलांसाठी पाककला विडी महिला कामगारांसाठी विडी वळणे स्पर्धा, शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, तर मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करून निरोगी जीवनाला गती दिल्याचे माने यांनी सांगून सामाजिक विधायक उपक्रमाचे कौतुक केले.या मॅरेथॉन स्पर्धेत ७१२५ स्पर्धक सहभागी झाले.१४ वर्षाखालील ३०७५, १७ वर्षाखालील २७०० खुला गटात स्पर्धकांनी १३५० भाग घेतला. यावेळी के.एल.ई. पासून



स्पर्धेचे नियोजन करण्यात आले होते. सूत्रसंचालन प्रकाश काशीद, दशरथ गुरव, अनिल पाटील, राजु प्याटी, दिपक शिंदे, संजय घोडके, राजु लामकाने, यांनी केले.

### स्पर्धा निकाल

१४ वर्षाखालील मुली गट : प्रथम-रिया सुनील चव्हाण, व्दितीय-रिया महेश शिंदे, तृतीय-अशिका प्रविण देशमुख, उत्तेजनार्थ-श्रध्दा बिरूदेव सरवदे

१४वर्षाखालील मुले गट प्रथम-रोहन कलप्पा चव्हाण, व्दितीय-मेघराज धानम्मा हिरेमठ, तृतीय-समर्थ श्रीनिवास धाकपाडे, उत्तेजनार्थ-ओम शिवशिंग चव्हाण

१७ वर्षाखालील मुली : प्रथम-साक्षी श्रीशैल व्हनमाने, व्दितीय-स्नेहा निकम राजमाने, तृतीय-मयुरी सिध्दराम स्वामी, उत्तेजनार्थ-अस्मिता हिराचंद काळे

१७ वर्षाखालील मुले : प्रथम-गणेश उमेश चव्हाण, व्दितीय-प्रतिक राजाराम मोहिते, तृतीय-रोहित मारुती व्होरडे


खुला गट-मुली : प्रथम - अर्चना श्रीशैल व्हनमाने, व्दितीय - स्नेहा मल्लीनाथ निंबर्गी, तृतीय - सादीया अ.करीम मुल्ला, उत्तेजनार्थ-गौरी तुकाराम कासवीर

खुला गट पुरुष : प्रथम-रोहन लालासो.तारके, व्दितीय-आशिष. नारायण ठोंबरे, तृतीय-सुमीत अविनाश जावीर, उत्तेजनार्थ-गणेश भिमराव कुंभार




## पिलीव बसस्थानकावर एस टी बस थांबत नसल्यामुळे प्रवासी संतप्त

✔ **पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव हे मुख्य गाव असून आसपासच्या दहा-बारा गावातील नागरिकांसाठी याठिकाणी मुख्य बसस्थानक आहे. सातारा, सोलापूर व पंढरपूर या आगाराच्या बसेस या रस्तावर मोठ्या प्रमाणात आहेत. पण या बसचालक वाहक यांच्या मनमानी कारभारामुळे पिलीव या बसस्थानकावर अनेक एस टी बसेस सध्या थांबतच नाहीत तर काही महाशय बसस्थानक सोडुन दुरवर बस थांबवित आहेत. यामुळे पिलीव येथील प्रवासी तसेच विद्यार्थी यांना तासन्तास बसस्थानकावर ताटकळत बसावे लागत आहे. याठिकाणी एस टी बस थांबविली नाही तर आपण रस्ता रोको करणार असल्याचे प्रवासी वर्गामधुन बोलले जात आहे. याविषयी सोलापूर, पंढरपूर व सातारा आगाराने दखल घेऊन प्रवाशयांची होणारी गैरसोय ताबडतोब टाळावी अशी मागणी पिलीव परीसरातील प्रवाशामधुन होत आहे. रविवारी दुपारी प्रवासी वर्गामधुन उद्रेक दिसून आला प्रवासांनी लातुर - वाई एस टी बस अडवून आंदोलन केले मात्र या बस मध्ये एकही प्रवासी या गाडीत घेतलाच नाही.



## विमानतळास क्रांतीसूर्य म. फुले यांचे नाव देण्याची मागणी

✔ **मोहोळ** : सोलापूर येथील विमानतळ चालू होण्यापूर्वीच त्या विमानतळास क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.सोलापूर येथील विमानतळ सुरूकरण्यास येणाऱ्या चिमणी चा अर्थ दूर करण्यात आला असून विमानतळ लवकर सुरू करण्याची मागणी जोर धरत असतानाच त्या विमानतळास क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी होऊ लागली आहे. याबाबत अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे नाशिक येथे त्यांची भेट घेऊन त्यांना याबाबतचे निवेदन देण्यात आले आहे यामध्ये सोलापूरचे ओबीसी समाजाचे कार्यकर्ते यश बनकर यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देताना यावेळी मोहोळ तालुका समता परिषदेचे अध्यक्षअमोल माळी शिवाजी भानवसे भागवत गायकवाड दीपक बनकरआदी उपस्थित होते.

## अक्कलकोट शहरात डुकरांच्या सुळसुळाट

✔ **अक्कलकोट** : शहरात डुकरांच्या सुळसुळाटामुळे घाणीचे साम्राज्य निर्माण होत आहे. मंदिर परिसरात अतिवावर होत असल्याने स्वामी भक्तांबरोबरच शहरवासियांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.शहरातील सर्व भागात झालेल्या पावसामुळे चिकलमय परिस्थिती निर्माण झालेले असताना यामध्ये डुकरांच्या धुमाकामुळे मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य निर्माण होत आहे.श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान, अन्नछत्र मंडळ, समाधी मठ, गुरु मंदिर, जुना अडत बाजार, बसस्थानक परिसर, कांदा बाजार, मार्केट यार्ड, शहरातील विविध गल्ली व चाळींतून असंख्य डुकरे मोकाटपणे फिरत आहेत. याबाबत नगरपरिषदेकडून मोकाट डुकरे सोडणार्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी पुढे येत आहे.

## गाडी आडवून पती-पत्नीला मारहाण; तिघांवर गुन्हा

✔ **सोलापूर** : गाडी आडवून पती-पत्नीस मारहाण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दत्तात्रय विठ्ठल खंदारे,निशांत मारुती खंदारे (दोघे.रा.पोखरापूर,ता. मोहोळ) यांच्यासह एका अनोळखी व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना २७ जुलै रोजी पुणे सोलापूर हायवे रोडवर घाण पाण्याच्या पुलाजवळ घडली.याप्रकरणी अंजली सागर खंदारे (वय-२२,रा.रेणुका नगर,जुळे सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.फिर्यादी व फिर्यादी यांचे पती मुलांसह फिर्यादी अंजली खंदारे यांची मावशी वंदना मस्के (रा.अकलूज) या आजारी असल्याने त्यांना भेटण्याकरिता महिंद्रा स्कार्पियो गाडी क्रमांक एम.एच.०८.आर.५२२० यात जाऊन घरी परत येत असताना वरील ठिकाणी फिर्यादी चालवत असलेली गाडी आडवून फिर्यादी व त्यांच्या पतीस हाताने मारहाण करून फिर्यादी यांच्या ड्रेसच्या शोल्डरला धरून ओढत कपडे फाडले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल घुगे हे करीत आहेत.

## अक्कलकोट येथे मुलांच्या भांडणावरून तरुणीस मारहाण

✔ **सोलापूर** :लहान मुलांच्या भांडणावरून लोखंडी सळई आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत मुजम्मा हणमंत डोंगरे (वय १८ रा.अक्कलकोट) ही तरुणी जखमी झाली . ही घटना शनिवारी दुपारच्या सुमारास घडली. तिला अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून हणमंत (वडील) यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले. तिला अनिता नागनाथ डोंगरे आणि सुवर्णा सिद्धप्पा गोरे या दोघींनी मारहाण केली . अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

## सर्जापूर आश्रम शाळेतील विद्युत मोटार चोरी ; आरोपी निष्पन्न

✔ **सोलापूर** :वैराग - सर्जापूर (ता.बार्शी) येथील माध्यमिक आश्रम शाळेच्या आवारातून पाण्याची विद्युत मोटर चोरीस गेल्याची घटना शनिवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात वैरागच्या पोलिसांनी अजय विठ्ठल गवळी (रा.सर्जापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. काल दुपारच्या सुमारास अजय गवळी याने आश्रम शाळेतील हौदावर असलेली पाण्याची मोटर चोरून नेला. अशा आशयाची फिर्याद आश्रम शाळेचे भारत चव्हाण यांनी पोलिसात दाखल केली. पुढील तपास हवालदार सोनकांबळे करीत आहेत.

# साखर कारखानदारांनी वापरले शेतकऱ्यांचे ५०० कोटी

## जिल्ह्यात २२५ कोटी 'एफआरपी' अद्यापही 'थकीत'; १५ कारखान्यांना नोटीसा

✔ सुराज्य/सोलापूर

**जिल्ह्यात चालू गळीत हंगामात साखर कारखानदारांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हक्काचे ५०० कोटीपेक्षा अधिक रक्कम वापरली असून १कोटी ८२ लाख २३ हजार ३३८ मेट्रिक टन गाळपाचे ५ हजार १४१ कोटी ६६ लाख रूपयापैकी जवळपास ६०० कोटी रूपये जानेवारीपासून थकीत ठेवले होते.या हंगामात शेतकऱ्यांनी जवळपास १ हजार कोटीचे कर्ज विविध बँकांकडून घेतले आहे यामध्ये ७५० कोटी पेक्षा जास्त रक्कम एकट्या जिल्हा मध्यवर्ती बँकेने दिली आहे.परंतु कारखान्यांनी पैसे थकविल्यामुळे शेतकऱ्यांना नाहक भुर्दंड बसला आहे.**



एकीकडे कारखानदारांनी हक्काचे कोट्यवधी रूपये वापरले असताना शेतकरी मात्र त्यांनी वापरलेल्या पैशाचे व्याज भरून बेजार झाला आहे. त्यामुळे साखर आयुक्तांनी कठोर पाऊले उचलून १४ दिवसाचा कायद्या पायदळी तुडविणाऱ्या कारखानदारांकडून १५ टक्के व्याजासह रक्कम देण्याची मागणी ऊस उत्पादक शेतकऱ्यांतून होत आहे.

साखर नियंत्रण आदेश,१९६६ च्या कलम ३(३) नुसार ऊस उत्पादकांचा ऊस गळीत झाल्यानंतर १४ दिवसाच्या कालावधीत ऊसाची संपूर्ण रक्कम देणे कायद्याने देणे बंधनकारक आहे.मात्र दरवर्षी ऊस हंगामात हा कायदा पायदळी तुडविला जातो.१ महिना सोडाच ६ -७ महिने शेतकऱ्यांना रक्कम दिली जात नाही.रक्कम थकल्यास कायद्याने संबंधित कारखान्याने १५ टक्के व्याजासह पैसे देणे बंधनकारक आहे.मात्र जिल्ह्यातील एकाही कारखान्याने वेळेत पैसे दिले तर नाहीतच.परंतु कायद्यानुसार १५ टक्केतील एक दमडीही दिली नाही.

साखर कारखान्यांनी गळीत हंगाम संपल्यानंतर ऊस उत्पादकांची एफआरपी देणे अपेक्षित होते.राज्यातील ८६ कारखान्यांकडे अद्यापही ८१७ कोटी रूपये थकीत आहेत.तर सोलापूर जिल्ह्यातील १५ कारखान्यांना नोटीसा काढल्या आहेत. सुनावणी मध्ये त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर वेळेत रक्कम न दिल्यास जप्तीच्या कारवाईचे आदेश काढले जातील.त्याबाबतची कारवाई तातडीने करण्याचे प्रस्तावित आहे.त्यामुळे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांशी माझे बोलणे सुरू आहे

**– डॉ.चंद्रकांत पुलकुंडवर** साखर आयुक्त,पुणे

जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी गेल्या हंगामात सुमारे १ हजार कोटी रूपये कर्ज घेऊन ऊस पिकांची जोपासना केली आहे.त्यापोटी तो शेतकरी बँकेत व्याजासह रक्कम भरीत असतो.परंतु कारखानदार मात्र फुकटात पैसे वापरीत आहेत.मात्र त्या पैशाचे व्याज शेतकरी भरणार असा भयंकर प्रकार जिल्ह्यात सुरू आहे.साखर कायद्याची अमंलबजावणी प्रभावी पणे झाल्यासच या लुटीला चाफ बसणार आहे.

यंदाच्या गळीत हंगामासाठी धुराडी पेटविण्याची लगबग सुरू झाली असून कारखान्यातील इतर कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. तर दुसरीकडे २०२२-२३ च्या गळीत हंगामात जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे १५ जुलैअखेर २२५ कोटी एफआरपी थकित आहे.याप्रकरणी साखर आयुक्त कार्यालयाने जिल्ह्यातील १५ कारखान्यांना नोटीस काढल्या असून यांची तीन टप्प्यात सुनावणी घेऊन कारखान्यांचे म्हणणे एकून घेतले जाणार आहे.त्यानंतर तात्काळ एफआरपी न दिल्यास त्या साखर कारखान्यांवर जप्तीची कारवाई होण्याची शक्यता आहे.त्यातून शेतकऱ्यांचे पैसे अदा केले जातील.

जिल्ह्यातील सर्वच कारखानदार गळीत हंगाम सुरू झाल्यानंतर डिसेंबर महिन्यापर्यंत गाळपासाठी आलेल्या ऊसाची रक्कम महिन्याभरात अदा करतात.मात्र त्यानंतर येणाऱ्या ऊसाची रक्कम थकविले जाते.दुसरा हंगाम सुरू करण्याच्या वेळी या रक्कमा दिल्या जातात.कारखानदार साखर तारण ठेवून कर्ज उचलता .पुढचा हंगाम सुरू करताना नवीन कर्ज घेतात.तेव्हांच मागणी हंगामातील पैसे शेतकऱ्यांना देतात.यामधून ते मोठ्या प्रमाणात व्याज वाचवितात.याचा आकडा काही कोटींच्या घरात आहे.

## सांगोला येथे मारुती मोटार पळवली

✔ सुराज्य/सांगोला

सांगोला येथील वासूद रोडवर राहणाऱ्या नकुल संगप्पा वसमाळे यांच्या घरासमोर लावलेली मारुती मोटार चोरट्याने पळवली . ही चोरी शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली.

या संदर्भात नकुल वसमळे यांनी सांगोला पोलिसात फिर्याद दाखल केली. त्यांच्या घरासमोर लावलेली पांढऱ्या रंगाची एमएच ४५-एडी-०५४५ या क्रमांकाची मारुती मोटर्स चोरट्याने चोरून नेली. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे हवालदार मेटकरी पुढील तपास करीत आहेत.

## फॅट्स व एसएनएफला पूर्वीचाच ३० पैसे दर असावा : खोत

✔ सुराज्य/सोलापूर



राज्य सरकारने गाईच्या दुधाला ३/५ फॅट आणि ८/५ एसएनएफला ३४ रुपये एवढा दर निश्चित केला आहे. त्याप्रमाणे दरपत्रक देखील जाहिर केले आहे. परंतु काही खासगी दूध संघांनी ३/५ फॅट आणि ८/५ एसएनएफच्या खाली ज्यांचे गुणप्रत असेल तर त्या दुधाला रिव्हर्स १ रुपये ठेवलेला आहे. त्यामुळे राज्यातील काही खासगी दूध संघानी शेतकऱ्यांवर जणू दरोडाच घातला आहे.

पूर्वी १ एसएनएफ व फॅटला ३० पैसे कमी होत होते. परंतु काही खासगी दूध संघाकडून चालू दरवाढीमध्ये कमी गुणप्रतीला १ रुपया दाखविलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे एसएनएफ व फॅट्स ही ३/५ , ८/५ पेक्षा कमी लागल्यास शेतकऱ्यांना खूप कमी दराने दूध विक्री करावी लागत आहे. त्यामुळे शेतकरी पुन्हा अडचणीत येत आहे. म्हणून एसएनएफ आणि फॅट्स मध्ये पूर्वीचाच ३० पैसे हा दर असावा, अशी मागणी रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष सदाभाऊ खोत यांनी दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे.

राज्यातील शेतकऱ्यांच्या दुधाला योग्य दर मिळावा यासाठी दर निश्चिती समितीच्या अहवालानुसार ३४ रूपये दर जाहीर केला परंतु दुध संघांनी तो सरकारने घेतलेला आदेश मान्य केला परंतु रिव्हर्स दरामध्ये वाढ केली. यामुळे शेतकऱ्यांना ३४ रूपये दर मिळण्याऐवजी ३० .५० रूपये दर मिळू लागल्याने शेतकऱ्यांतून प्रचंड नाराजी व्यक्त होवू लागली.

तसेच राज्यातील सर्व खासगी आणि सहकारी दूध संघाचे दूध गुणवत्ता प्रत तपासणी यंत्र (लॅक्टोमीटर) याची देखील तात्काळ तपासणी करण्यात यावी, ही मागणी देखील लावून धरली. यावर मंत्री विखे पाटील यांनी सकारात्मकता दाखवली असून त्याबाबतीत लवकरच निर्णय घेतला जाईल असे सांगितले

यावेळी सोलापूर चे खासदार जय सिद्धेश्वर स्वामी माढ्याचे आमदार बबनराव शिंदे आदी उपस्थित होते.



## 'फकीरा'त जोगतीण नाही तर जोगणी शब्द : अष्टुळ

✔ सुराज्य/मोहोळ

अभ्यासक्रमातील संदर्भ ग्रंथातून जोगतीण ऐवजी जोगणी असा शब्द वाचावा अशी दुरुस्ती सुचविण्यात आली त्यास विद्यापरिषदेच्या दिं २७ जुलै रोजी झालेल्या सभेत मान्यता देण्यात आलेली आहे. असे विद्यापीठाचे लेखीपत्र साहित्य सम्राटचे संस्थापक अध्यक्ष, अभ्यासक व आंदोलक विनोद अष्टुळ आणि सहआंदोलक राजेश रासगे यांना सहभागी आंदोलकांच्या उपस्थितीत बहाल केले.

साहित्य सम्राट पुणे व मातंग विकास संस्था खडकी यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुख्य इमारतीजवळ तीन दिवसाचे धरणे आंदोलन आयोजित केले होते. यावेळी साहित्य सम्राटचे संस्थापक विनोद अष्टुळ यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या. यावेळी मातंग विकास संस्थेचे संस्थापक राजेश रासगे, समाजभूषण पुरस्कारथी शंकरभाऊ तडाखे, अखिल भारतीय बहुजन सेनेचे निलेश वाघमारे, गणेश भालेराव, लहुजी महासंघाचे प्रकाश वैराळ, लहुजी पॅन्थर संघटनेचे महेश सकट, सुनील मोरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी आंदोलनस्थळी शुद्धीपत्र मिळणे बाबत या विषयास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एम. ए. मराठी अभ्यासक्रमातील ग्रामीण साहित्य आणि शोध या ग्रंथातील अण्णा भाऊ साठे यांच्या फकीरा या कादंबरीतील लेखात जोगणी या शब्दाच्या ऐवजी जोगतीण असा शब्द आलेला आहे, या संदर्भात उपरोक्त लेखाचे लेखक व संपादक यांनी अनावधानाणे झालेली ही चूक मान्य केलेली असून, त्यात सुधारणा करण्यासंदर्भातील आपले लेखी म्हणणे मांडलेले आहे. या संदर्भात दिं १३ जुलै, २०२३ झालेल्या मराठी अभ्यासमंडळाच्या बैठकीत चर्चा झाली.

गेली अनेक वर्षे जोगतीण हा चुकीचा शब्द अभ्यासकांना अभ्यासाला असल्यामुळे जगविख्यात अण्णा भाऊंच्या फकिरा कादंबरीचा आदर्श आणि इतिहास नष्ट होणार होता. यासाठी गेली पाच वर्षे अभ्यासक अष्टुळ यांनी विविध उपायांद्वारे अथक परिश्रम घेऊन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे सातत्याने पाठपुरावा केला.

यावेळी विद्यापीठाचे अधिसभा सदस्य सुनील लोखंडे, शंकरभाऊ तडाखे, यांनीही या संशोधन् कार्याची प्रशंसा केली. तीन दिवसाच्या या धरणे आंदोलनामध्ये राजेश पाठेनम, तुषार काहुर, क्षुधांत पाटील, महादेव रंगा, विजय रास्ते, माधवराव घाटे. दत्ता जाधव, प्रेम माने, सुदर्शन चखाले, महेश सूर्यवंशी, सौरभ कस्तुरे, ओंकार अष्टुळ, सबिता चटर्जी इत्यादी असे अनेक सहभागी झाले होते.

## नरखेड येथे उद्या धर्मसभेचे आयोजन

✔ सुराज्य/सोलापूर

मोहोळ तालुक्यातील नरखेड येथील श्री सिद्धेश्वर मंदिरात अधिक मासानिमित्त मंगळवार दि.१ ऑगस्ट रोजी दुपारी चार वाजता काशीचे जगद्गुरू डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी यांची धर्मसभा आयोजित करण्यात आली आहे.




नरखेड येथील संयोजक डॉ. लवंगे, वीरशैव समाज, बसवेश्वर युथ फौंडेशन,शिवशक्ती गणेश मंडळ व नरखेडचे ग्रामस्थ यांच्या वतीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

याप्रसंगी महास्वामींची पाद्यपूजा, आशीर्वचन, वृक्षारोपण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार असे कार्यक्रम होणार आहेत.

याप्रसंगी ष.ब्र मणिकंठ शिवाचार्य दहिवडकर महाराज यांची उपस्थिती असणार आहे. तरी भाविकांनी धर्मसभेला उपस्थित रहावे,असे आवाहन डॉ.वसंतराव लवंगे यांनी केले आहे.

## स्वेरीच्या पाच विद्यार्थ्यांची 'जबील' या कंपनीत निवड



✔ सुराज्य/पंढरपूर

'जबील' या बहुराष्ट्रीय कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील पाच विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राशी संबंधीत असलेल्या पुणे येथील जबील' या कंपनीच्या निवड समितीने अंतिम फेरीतून इंजिनिअरिंगच्या सुमेध संजयकुमार गायकवाड, गणेश दादाराव कवडे, श्रेया दीपक कुलकर्णी, ओंकार अंकुश झिंगाडे व ऐश्वर्या आप्पा देवकुळे या पाच विद्यार्थ्यांची निवड केली. विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे प्रयत्न आणि स्वेरीतील शैक्षणिक कल्चर यामुळेच स्वेरीतील विद्यार्थ्यांना नोकरीच्या भरपूर संधी उपलब्ध होत आहेत आणि त्यातून स्वेरीवर असलेला पालकांचा विश्वास आणखी दृढ होत आहे. विद्यार्थ्यांना स्वेरी मध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामध्ये ॲप्टिट्यूड, कम्युनिकेशन स्किल, एडवॉन्स टेक्निकल ट्रेनिंग, मॉक इंटरव्यूव, ग्रुप डिस्कशन, सॉफ्टवेअर ट्रेनींग या व्यतिरिक्त जागतिक स्तरावर संधी मिळण्यासाठी जापनीज लैंग्वेज ट्रेनींग तसेच जीआरई, टोफेल या संदर्भात मार्गदर्शन केले जाते. सदर विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध होत असल्याने विशेषतः पालक वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, आदींनी अभिनंदन केले आहे.

# किसान सन्मान योजनेच्या अटी शिथिल करा

## आ. रणजितसिंहांची विधानपरिषदेत मागणी

✔ सुराज्य/अकलूज

**प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचे निकष राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेसाठी लागू करण्यात आले असून राज्यातील ९७ लाख ६५ लाभार्थ्यां शेतकऱ्यांपैकी जास्तीत जास्त शेतकर्यांना केंद्र सरकार आणि राज्य शासनाच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेचा हप्ता मिळाला पाहिजे निकषांच्या अटीत ते राज्यशासनाच्या पहिल्या हप्त्यापासून वंचित राहू नयेत,निकषांच्या अटी शिथिल केल्या पाहिजेत म्हणून आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी विधानपरिषदेत प्रश्न उपस्थित केला.**

प्रत्येक हप्त्यावेळी लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या घटत आहे. योजनेच्या निष्कर्षामध्ये वारंवार केलेल्या बदलामुळे १४ व्या हप्त्यासाठी राज्यातील फक्त ८५ लाख ६६ हजार पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना हप्ता वर्ग झाला आहे.अशा प्रकारे केवायसीच्या माध्यमातून अटी शर्ती लागून करून लाभार्थ्यांची शेतकरी कमी कमी होत आहे,किसान योजनेच्या लाभार्थ्यासाठीच्या अटी शिथिल करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेचा लाभ देण्याबाबत तसेच दोन्ही योजनांतर्गत जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत शासनाने त्वरित कार्यवाही करण्याची विनंती आ.मोहिते-पाटील यांनी राज्यसरकारकडे केली.



यावर कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी पात्र लाभार्थ्यांची भूमि अभिलेख नोंदीप्रमाणे पोर्टलवर माहिती अद्ययावत करणे, ई-केवायसी प्रमाणिकरण व बँक खाती आधार संलग्न करणे या तिनही बाबींची पूर्तता केलेले एकूण ७६.५५ लाख लाभार्थी १४ व्या हप्त्याच्या लाभासाठी पात्र ठरल्याचे सांगितले तथापि,केंद्र शासनाने बंधनकारक केलेली ई-केवायसी प्रमाणिकरणाची बाब शिथिल केली असल्याने सद्य:स्थितीत राज्यातील एकूण ८५.०१ लाख पात्र लाभार्थींना लाभ झाल्याचे सांगितले.

तसेच राज्यातील एकूण ९७.६५ लाख पात्र लाभार्थीपैकी ९५. २७ लाख लाभार्थीच्या भूमि अभिलेख नोंदी पी.एम. किसान पोर्टलवर अद्ययावत करण्यात आलेल्या आहेत.उर्वरीत २.३८ लाख लाभार्थीच्या नोंदी अद्ययावत करण्यासाठी संबंधित सर्व जिल्हाधिकारी यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

प्रधान मंत्री किसान योजनेतील पात्र शेतकर्यांचा मृत्यु झाला असल्यास त्यांच्या वारसांना ७/१२ उतार्यावर नोंद लागुन नव्याने रजिस्ट्रेशन केलेले असले तरी किसान सन्मान योजनेचा लाभ लाभ मिळालेला नाही.जिल्हा प्रशासनाने या गोष्टीत लक्ष घालुन राज्य सरकारच्या पहिल्या हप्त्यापासुन मृत शेतकर्यांचे वारस वंचित राहणार नाहीत याची जबाबदारी घेतली पाहीजे.

# पुण्यातील आयआयटीएमने रचला सोलापुरात इतिहास



✔ सुराज्य/पुणे

**सोलापूर जिल्ह्यात पार पडलेले कृत्रिम पावसाचे प्रयोग यशस्वी झाल्याचा निष्कर्ष पुण्यातील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटीओरोलॉजी'च्या (आयआयटीएम) हवामान शास्त्रज्ञांनी काढला आहे. केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्रालयाने कृत्रिम पावसाच्या प्रयोगांचा अहवाल दिल्ली येथे नुकताच प्रसिद्ध केला. विमानांमधून विशिष्ट प्रकारच्या ढगांमध्ये क्षारांची फवारणी केल्यानंतर पावसाच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाल्याचे सोलापूरच्या प्रयोगांमधून सिद्ध झाले.**

## ढगांवर क्षार फवारणीनंतर धो-धो पाऊस बरसला

'आयआयटीएम'च्या पुढाकाराने २००९ मध्ये कायपिक्स हा प्रकल्प सुरू झाला. प्रकल्पाच्या चौथ्या टप्प्यात २०१८-१९ या दोन वर्षांमध्ये मान्सून काळात सोलापूर जिल्ह्यात प्रत्यक्ष कृत्रिम पावसाचे प्रयोग करण्यात आले. त्यासाठी अमेरिकेवरून दोन विमाने मागवण्यात आली होती.

एका विमानाद्वारे ढगांमध्ये क्षारांची फवारणी; तर पाठोपाठ येणाऱ्या दुसऱ्या विमानाद्वारे ढगांमध्ये घडणाऱ्या प्रक्रियांच्या नोंदी घेतल्या गेल्या. सोलापूर जिल्ह्यात १३० ठिकाणी बसवण्यात आलेल्या पर्जन्यमापकांच्या साह्याने क्षारांच्या फवारणीनंतर किती वेळात, कोणत्या भागांत आणि किती पाऊस पडतो याची पडताळणी करण्यात आली.

या प्रयोगांच्या निष्कर्षांबाबत कायपिक्स प्रकल्पाच्या प्रमुख डॉ. तारा प्रभाकरन यांनी सांगितले की, 'कृत्रिम पावसाचे प्रयोग जागतिक हवामानशास्त्र संघटनेच्या (डब्ल्यूएमओ) मार्गदर्शक सूचनांनुसार पूर्णतः वैज्ञानिक पद्धतीने पार पडले. त्यासाठी रडारचा उपयोग, न्यूमेरिकल मॉडेल आणि रँडम सॅम्पलिंगची पद्धत वापरण्यात आली.

मान्सून काळात नैसर्गिकरीत्या पाऊस सक्रिय नसताना आम्ही निवडलेल्या काही ढगांमध्ये क्षारांची फवारणी करण्यात आली. काही ढगांमध्ये क्षारांची फवारणी केली नाही. दोन्ही प्रकारच्या ढगांमधून ज्या भागांमध्ये पाऊस होऊ शकतो तेथील पर्जन्यमानाच्या नोंदी तपासण्यात आल्या.'

'मान्सून काळात पाण्याचे विशिष्ट प्रमाण असलेल्या आणि वरच्या दिशेने वाढणाऱ्या ढगांमध्ये ठरावीक वेळेत क्षारांची फवारणी केल्यास पावसाच्या प्रमाणात वाढ होते, हे आमच्या प्रयोगांतून सिद्ध झाले. विमानांद्वारे ढगांमध्ये क्षारांची फवारणी केल्यानंतर सोलापूर जिल्ह्यात बसविण्यात आलेल्या ४३ पर्जन्यमापकांवरील नोंदींनुसार पावसाचे प्रमाण ४६ टक्क्यांनी वाढले; तर सी बँड रडारच्या नोंदींनुसार १०० वर्ग किलोमीटर क्षेत्रातील पावसामध्ये १८ टक्के वाढ झाली. आम्ही लावलेल्या अंदाजानुसार प्रत्येक उड्डाणातून झालेल्या क्षारांच्या फवारणीनंतर सुमारे ८६७ दशलक्ष लिटर पाणी जमिनीवर आले.

ढगांची नेमकी माहिती असेल, योग्य कार्यपद्धती वापरली, तर कृत्रिम पावसाचा प्रयोग यशस्वी होतो आणि तो किफायतशीरही आहे, हे आमच्या प्रकल्पातून सिद्ध झाले,' असेही डॉ. तारा म्हणाल्या.

### असा झाला पावसाचा प्रयोग

▶ सी बँड रडारच्या साह्याने दोन वर्षांमध्ये, मान्सून काळात विविध दिवशी पाण्याचे विशिष्ट प्रमाण असलेले एकूण २६७ ढग ओळखण्यात आले. ▶ त्यांच्या अभ्यासासाठी दोन विमानांची प्रत्येकी १०३ उड्डाणे झाली. ▶ निश्चित केलेल्या १४५ ढगांमध्ये एका विमानाद्वारे 'कॅल्शियम क्लोराइड'च्या क्षारांची फवारणी करण्यात आली. १२२ ढगांमध्ये केली नाही. सर्व ढगांमधील प्रक्रियांचा दुसऱ्या विमानाद्वारे अभ्यास करण्यात आला. ▶ या सर्व ढगांचे पावसाचे क्षेत्र ओळखून त्या भागातील १३० पर्जन्यमापकांवर पावसाच्या नोंदी घेण्यात आल्या; तसेच रडारच्या साह्याने सोलापूरच्या १०० वर्ग किमी क्षेत्रातील पावसाच्या नोंदी घेण्यात आल्या. ▶ कायपिक्सच्या चौथ्या टप्प्यात वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि संशोधक अशा २५ जणांचा सहभाग होता. या संशोधनाचे निष्कर्ष लवकरच आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रसिद्ध होणार आहेत.

देशातील मोठा भूभाग पर्जन्यछायेच्या प्रदेशात येतो; तसेच दुष्काळाच्या वर्षांमध्ये शेतकऱ्यांची पिके वाचवण्यासाठीही कृत्रिम पावसाचा पर्याय योग्य असल्याचे कायपिक्स प्रकल्पातून सिद्ध झाले.

२००९पासून 'आयआयटीएम'मधील अनेक शास्त्रज्ञांनी घेतलेल्या परिश्रमांमुळे भारतीय ढगांचे अंतरंग समोर आले आणि कृत्रिमरीत्या पावसात वाढ करण्याची वैज्ञानिक पद्धतही समजली.

**- डॉ. आर. कृष्णन,
संचालक, आयआयटीएम.**

## ▶▶ महत्त्वाचे वृत्त...

### दहशतवाद्यांना पैसा पुरविणारा सापडला

✔ **पुणे :** कोथरूडमध्ये अटक केलेल्या दहशतवाद्यांना तसेच त्यांना राहण्यास खोली देणाऱ्याला आर्थिक रसद पुरविणाऱ्या मॅकेनिकल इंजिनिअरला राज्य दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) रत्नागिरी येथून अटक केली. निसाब नसरुद्दीन काझी (वय २७) असे आरोपीचे नाव आहे. खासगी कंपनीत काम करणाऱ्या काझीला १५ लाख रुपये वार्षिक उत्पन्न आहे. त्यातील काही रक्कम तो दहशतवादी कारवायांसाठी देत असल्याची माहिती 'एटीएस'ला मिळाली आहे. दुचाकी चोरण्याच्या तयारीत असलेल्या महंमद युनूस महंमद याकू साकी (वय २४) आणि महंमद इम्रान महंमद युसूफ खान (वय २३, दोघे रा. चेतना गार्डन, मीठानगर, कोंढवा) यांना कोथरूड पोलिसांच्या पथकाने अटक केली होती. जयपूर येथील संभाव्य घातपात प्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) या दोघांवर गुन्हा दाखल केला असून, हे फरारी दहशतवादी असल्याची माहिती तपासात पुढे आली. या दोघांना आश्रय दिल्याच्या आरोपावरून मूळच्या गोंदियामधील आणि सध्या कोंढवा परिसरात वास्तव्याला असलेल्या अब्दुल कादिर दस्तगीर पठाण (वय ३२) याला 'एटीएस'ने अटक केली.

### नेमबाजचे आणखी होते तिघे लक्ष्य

✔ **नागपूर :** दुहेरी हत्याकांडाचा सूत्रधार व नेमबाज ओंकार महेंद्र तलमले (वय २५, रा. स्मृती लेआउट) याने पूर्वी तीन व्यापाऱ्यांशी संपर्क साधला होता. तिघांनाही दीड कोटींच्या डीडीच्या मोबदल्यात २ कोटी ८० लाख रुपये देण्याचे आमिष दाखविले. तहसीलमधील एका व्यापाऱ्यासह तिघांनी याला सहमतीही दर्शवली. परंतु याचदरम्यान कुख्यात हर्ष हा ओंकारचा साथीदार असल्याची कुणकूण या व्यापाऱ्यांना लागली अन् त्यांनी ओंकार सोबत संबंध तोडले. त्यामुळे तिघेही बचावले, अशी धक्कादायक माहिती पोलीस तपासादरम्यान समोर आली आहे.

### इंस्टाग्राम वरील मैत्री महागात पडली

✔ **डोंबिवली :** डोंबिवलीत एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका अल्पवयीन मुलीचे आयुष्य एका नराधमाने उद्ध्वस्त केल्याचा प्रकार उघडकीस आला असून यासंदर्भात मुलीच्या कुटुंबीयांनी टिळकनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली असता हा सर्व प्रकार उघडकीस आला आहे. यातील आरोपी काशिनाथ पाटील याला टिळकनगर पोलिसांनी डोंबिवली पश्चिमेतून अटक केली आहे. डोंबिवलीत राहणाऱ्या आरोपी काशिनाथ पाटील याने इंस्टाग्रामवर एका अल्पवयीन मुलीची ओळख केली. त्यानंतर त्याने मुलीला आपल्या जाळ्यात ओढत डोंबिवली पश्चिम येथे भेटण्यास बोलवले आणि संधीचा फायदा घेत तिचा गैरफायदा घेतला. आरोपी काशीनाथ याने २४ जुलै रोजी तिला बाहेर बोलून घेतले.

### शिक्षण क्षेत्रातील मलई पडणार महागात

✔ **नाशिक :** लाचखोरीने पोखरलेल्या शिक्षण विभागाला वठणीवर आणण्यासाठी अखेर राज्यातील ३३ अधिकाऱ्यांवर लाचलुचपत प्रतिबंध विभागामार्फत (एसीबी) आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. त्यापैकी आठ अधिकारी नाशिक विभागातील असून, त्यांची चौकशीही 'एसीबी'मार्फत सुरू झाली आहे. चौकशीच्या या फेऱ्यामुळे लाचखोरी आणि निलंबनानंतर पदांवर आलेल्या शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना पुन्हा एकदा चौकशीला सामोरे जावे लागणार आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमात घुसून जाब विचारणार : शेट्टी

✔ सुराज्य/जळगाव



स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक आणि माजी खासदार सध्या जळगाव आणि बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर, जळगाव जामोद आणि शेगाव तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळं शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालेलं आहे. यासह छोट्या व्यावसायिकांचं देखील नुकसान झालं असून त्यांना मदत करण्यात यावी म्हणून राजू शेट्टी यांनी राज्य सरकारला अल्टिमेटम दिला आहे. राज्य सरकारनं शेतकऱ्यांना तातडीनं मदत केली नाही तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शासन आपल्या दारी या कार्यक्रमात घुसून जाब विचारु असं राजू शेट्टी म्हणाले.

सध्या पक्षाची जी फोडाफोडी सुरू आहे. राजकारणाचा जो खेळखंडोबा सुरू आहे. त्यामुळे सर्वसामान्यांकडे त्यांच्या मूलभूत प्रश्नाकडे सर्वांचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे सर्व सामान्य मतदार जनतेने विचार करावा....या सर्वांना आता कात्रज चा घाट दाखविण्याची वेळ आली आहे, असं परखड मत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी व्यक्त केले आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी हे जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यादरम्यान मुक्ताईनगर येथे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्या, अन्यथा पुढच्या शासन आपल्या दारी या कार्यक्रमात घुसू असा इशारा देखील राजू शेट्टींनी राज्य सरकारला दिला आहे. शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे सत्ताधाऱ्यांसह विरोधकांचेही दुर्लक्ष झाल्याचे नमूद करत ''आठ दिवसांच्या आत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत न मिळाल्यास आपण शासन आपल्या दारी कार्यक्रमात थेट शिरून मुख्यमंत्र्यांना जाब विचारणार आहे '' असा इशारा स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी दिला.

# असा असेल पंतप्रधान मोदींचा पुणे दौरा

✔ सुराज्य/पुणे



पंतप्रधान नरेंद्र मोदी १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारण्यासाठी पुण्यात येणार आहेत. या दिवशी मोदी प्रसिद्ध श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेतील; तसेच टिळक स्मारक येथे लोकमान्य टिळक यांना अभिवादन करतील. त्यानंतर शिवाजीनगर येथील पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर मोदी यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम होण्याची शक्यता आहे.

लोकमान्य टिळक ट्रस्टतर्फे लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीला लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराचे वितरण केले जाते. यंदा हा पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जाहीर झाला आहे. मोदी यांनी हा पुरस्कार स्वीकारला असून, ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे. पुरस्कार वितरणाचा तपशील किंवा पंतप्रधानांचा अधिकृत दौरा अद्याप जाहीर झालेला नाही. मात्र, पंतप्रधानांच्या सुरक्षा अधिकाऱ्यांकडून; तसेच जिल्हा प्रशासन, महापालिका आणि पोलीस दलाकडून या दौऱ्याची तयारी सुरू करण्यात आली आहे.

विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पुणे आणि पिंपरी-चिंचवडचे महापालिका; तसेच पोलीस आयुक्त यांनी नुकतीच लोहगाव विमानतळ तसेच मोदी यांच्या शहरातील संभाव्य प्रवासमार्गाची पाहणी केली. त्याचबरोबर मोदी यांच्या दौऱ्याच्या नियोजनासंदर्भात रविवारी भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचीही बैठक झाली. त्यात नेमके कोणकोणते कार्यक्रम घेता येतील, याची चाचपणी करण्यात आली. या सर्व बैठकांमधून मोदी यांच्या सुमारे तीन ते चार तासांच्या पुणे दौऱ्याची रूपरेषा निश्चित करण्यात आली आहे.

पंतप्रधान कार्यालयातून वरिष्ठ अधिकारी आणि सुरक्षा अधिकारी पुण्यात येऊन प्रत्यक्ष जागांची, व्यवस्थेची पाहणी करतील. त्यानंतरच अंतिम दौरा जाहीर होईल, असे सूत्रांनी सांगितले.

# आमदार, मंत्र्यांनी अविश्वास दाखवल्याने जवानांची मने दुखावली



✔ सुराज्य/मुंबई

पोलीस दलामध्ये कंत्राटी' पद्धतीवर महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या (मसुब) जवानांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतल्यानंतर विधिमंडळाच्या अधिवेशनात वादळी चर्चा झाली. मुंबईची सुरक्षा कंत्राटी जवानांच्या हातामध्ये दिल्याने सुरक्षा धोक्यात येईल, अशी टीका करण्यात आली.

मात्र, वस्तुस्थिती वेगळी असून, राज्यातील ३५०पेक्षा अधिक संवेदनशील आस्थापनांची जबाबदारी याच जवानांच्या खांद्यावर आहे.

अडीचशे जवानांपासून सुरू झालेल्या या बलाची ताकद १५ हजारांवर पोहोचली आहे. मात्र, १० ते १२ वर्षे कंत्राटी' पद्धतीनेच जवानांना राबवून घेतले जात आहे. अनेक वर्षे झगडूनही कुणी लक्ष देत नसल्याने या वेळी अधिवेशनात हा विषय चर्चेत आल्याने काही प्रमाणात समाधान आहे. परंतु, कंत्राटी'चा शिक्का कधी पुसला जाणार, असा प्रश्न जवान करीत आहेत.

# दादा कोंडकेंच्या चित्रपटांची प्रिंट एंटरटेन्मेंटकडे सोपवण्याचा आदेश

✔ सुराज्य/मुंबई

मराठी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध दिवंगत अभिनेते व निर्माते दादा कोंडके यांच्या १२ लोकप्रिय चित्रपटांच्या प्रिंट पॉझिटिव्ह/निगेटिव्हज या एव्हरेस्ट एंटरटेन्मेंट कंपनीकडे सोपवण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने फिल्म एंटरप्राईजेस प्रायव्हेट लिमिटेड आणि नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड या दोन फिल्म लॅबारेटरीजना नुकतेच दिले.

'दादा कोंडके यांचे १४ मार्च १९९८ रोजी निधन झाले. त्यापूर्वीच २ जानेवारी १९९८ रोजी त्यांनी आपले मृत्यूपत्र तयार करून आपली बहीण लीलाबाई मोरे यांच्या स्नुशा माणिक मोरे यांच्याकडे चित्रपटांचे हक्क सोपवले होते. यामध्ये सोंगाड्या, आंधळा मारतो डोळा, पांडु हवालदार, बोट लावीन तिथे गुदगुल्या, आली अंगावर, सासरचे धोतर, मुका घ्या मुका आणि अंधेरी रात में दिया तेरे हाथ में (हिंदी) या चित्रपटांचा समावेश होता.



दादांच्या मृत्यूपत्राबाबत पुणे न्यायालयाने तपासणीअंती २००८मध्ये प्रमाणपत्रही दिले होते. त्यामुळे संपूर्ण हक्क हे माणिक मोरे यांच्याकडे होते. त्यांनी १० ऑगस्ट २०२२ रोजी ते आमच्याकडे दिले होते. परिणामी प्रतिष्ठानच्या विश्वस्तांच्या दाव्यात अर्थ नाही', असे म्हणणे 'एव्हरेस्ट'ने ज्येष्ठ वकील आशीष कामत यांनी मांडले. तर 'उच्च न्यायालयाने एव्हरेस्ट कंपनीला दिलासा दिल्यास पुणे न्यायालयातील दाव्यातील सुनावणीत अडथळा निर्माण होईल', असे म्हणणे विश्वस्तांच्या वकिलांनी मांडले. मात्र, दादांच्या मृत्यूपत्राप्रमाणे मूळ स्वामित्व हक्क हे माणिक यांच्याकडे होते, हे प्रथमदर्शनी स्पष्ट होत असल्याने तूर्त प्रिंट 'एव्हरेस्ट'कडे द्यावेत, असे न्या. छागला यांनी अंतरिम आदेशात स्पष्ट केले.


# कोरोना चौकशीचे गुऱ्हाळ

## अधिकार नसतानाही औषधखरेदीचा घाट

✔ **छत्रपती संभाजीनगर :** महापालिकेने कोरोनाकाळात आयुक्तांचे विशेषाधिकार वापरुन करण्यात आलेली औषध खरेदी आता चौकशीच्या फेऱ्यात सापडली आहे. प्रशासक जी. श्रीकांत यांनी अतिरिक्त आयुक्तांना या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले. कोरोनाकाळात महापालिकेच्या चिकलठाणा येथील मेल्ट्रॉन रुग्णालयात रुग्णांवर उपचार केले जात होते. या काळात ९१ लाख ६४ हजार १४२ रुपयांची औषध खरेदी करण्यात आली. करण्यात आलेल्या औषध खरेदी बद्दल माहिती अधिकार कार्यकर्ते विक्की शिंदे यांनी माहिती मागितली होती. त्यांना देण्यात आलेल्या माहितीत पालिका प्रशासनाने म्हटले आहे की, तत्कालीन प्रशासकांनी रुग्णांच्या हितासाठी कोणतीही निविदा प्रक्रिया न राबवता ६७ (३) सी कलमानुसार औषध खरेदी करण्याची मुभा दिली होती. रुग्णालयाच्या स्वतंत्र खात्यात निधी वर्ग करण्यात आला होता. रुग्णालयाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य वैद्यकीय अधिकारी यांच्या स्वाक्षरीने २०२० ते २०२२ या काळात औषधींची खरेदी करण्यात आली. मेल्ट्रॉन हॉस्पिटलमध्ये ८३४५ रुग्णांवर उपचार करण्यात आले, त्यासाठी ९१ लाख ६४ हजार १४२ रुपये खर्च करण्यात आले.

# फुले जनआरोग्याचा लाभ सर्वांना मिळणार

## खर्चाची मर्यादाही वाढवली



✔ सुराज्य/मुंबई

राज्य सरकारची महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना ही आता अधिक व्यापक करण्यात आली असून राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारक व अधिवास प्रमाणपत्रधारक नागरिकांना लागू करण्यात आली आहे. राज्यातील एकूण अंगीकृत रुग्णालयांची संख्या १,३५० झाली असून सर्व लाभार्थी नागरिकांचे आरोग्य कवचही दीड लाख रुपयांऐवजी आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेप्रमाणे पाच लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आले आहे. मागील महिन्यात २८ जून रोजी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागाने शुक्रवार, २८ जुलै रोजी सुधारित योजनेचा शासन निर्णय तपशीलवार जाहीर केला. केंद्र सरकारच्या योजनेसोबत सुधारित स्वरूपात राज्याची जनआरोग्य योजना राबवण्यात येणार असल्याने अधिकाधिक लोकांना त्याचा लाभ मिळणार आहे. राज्यात यापूर्वी केशरी शिधापत्रिका व अंत्योदय शिधापत्रिका असणाऱ्या नागरिकांनाच फुले जनआरोग्य योजनेचा लाभ मिळत होता. आता राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारक, अधिवास प्रमाणपत्र प्राप्त नागरिकांना आरोग्य संरक्षणाचे कवच.

▶ प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेप्रमाणेच प्रतिकुटुंब प्रतिवर्ष पाच लाख रुपयांचे आरोग्य कवच. ▶ एकत्रित अंमलबजावणीमुळे दोन्ही योजनांतील समाविष्ट उपचारांचा लाभ. ▶ सध्या फुले योजनेत ९९६ तर, प्रधानमंत्री योजनेत एक हजार २०९ उपचार. त्यात वाढ केल्याने आता दोन्ही योजनांत प्रत्येकी एक हजार ३५६ उपचारांचा समावेश. ▶ १,३५६ उपचारांपैकी ११९ उपचार शासकीय रुग्णालयांसाठी राखीव. ▶ एकत्रित योजनेमध्ये अंगीकृत रूग्णालयांची एकूण संख्या एक हजार. ▶ फुले योजना याआधीच महाराष्ट्र - कर्नाटक सीमाभागात लागू करून सीमेलगतच्या महाराष्ट्र राज्यातील आठ जिल्ह्यांमध्ये १४० आणि कर्नाटक राज्यातील दहा अतिरिक्त रुग्णालये अंगीकृत करण्याचा निर्णय झाला आहे. याव्यतिरिक्त दोनशे रूग्णालये अंगीकृत करण्यास मान्यता देण्यात आल्याने अंगीकृत रुग्णालयांची संख्या एक हजार ३५०. ▶ सर्व शासकीय रुग्णालये अंगीकृत करण्यात आली असून यापुढे मागास भागात नव्याने सुरू होणारी सर्व रुग्णालयेही त्यांची इच्छा असल्यास एकत्रित योजनेत अंगीकृत केली जाणार. ▶ मूत्रपिंड शस्त्रक्रियेसाठी फुले जनआरोग्य योजनेतील उपचार खर्च मर्यादा अडीच लाख रुपयांवरून वाढवून साडेचार लाख रुपये. ▶ स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेचा फुले जनआरोग्य योजनेत समावेश; तसेच रस्ते अपघाताबाबतच्या उपचारांची संख्या ७४ वरून १८४ करण्यात आली. उपचाराच्या खर्च मर्यादेतही प्रतिरुग्ण ३० हजार रुपयांवरून एक लाख रुपये, अशी वाढ. यात राज्याच्या भौगोलिक क्षेत्रातील रस्ते अपघातांत जखमी झालेल्या, राज्यातील व देशातील रुग्णांचा समावेश होणार.




## काय म्हणतयं? पॉलिटिक्स

# झाले मोकळे मार्ग...!




शंकर जाधव, कार्यकारी संपादक

मो. ९५१८७७३०४८

**आकाशात ढग दाटून आले की आकाशालाही वाटते पाऊस पडावा आणि आपण मोकळे व्हावे, निरभ्र व्हावे असे. म्हणूनच एका गीतात म्हटले आहे, 'झाले मोकळे आकाश'. आकाश या ढगांचे सारथ्य करीत असतो. ढगांना बरसण्यासाठी वाट मोकळी करुन तो देत असतो. हा निसर्गनियम आहे. हा नियम अलिकडीत राजकीय मंडळींना तसा लागू होत नसला तरी राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांच्या भाऊगर्दीत घुसटमलेले, अन्याय झालेले, पक्षात मान-सन्मान मिळत नसलले, नेत्यांकडून कामे होत नसलेले असे अनेक चेहरे आतून दाटून गेले आहेत. त्यांच्यातला हा दाटलेपणा हळहळू बाहेर येत आहे. आपल्या अस्तित्वासाठी आयुष्यभर पक्षासाठी आणि जनतेसाठी झटलेले असे चेहरे अडगळीत पडतात की काय?, अशीच त्यांना भिती आहे. त्यामुळे अशी मंडळी आता आपला जम बसविण्यासाठी कुठल्या ना कुठल्या पक्षाचा पदर खेचत आहेत. भावी काळात त्यांनी ज्या पक्षाचा पदर खेचला आहे. तो पक्ष त्यांना कसा साथ देईल..., विश्वास टाकेल... न्याय देईल..., हे पाहण्यासारखे ठरणार आहे. पण एवढे खरे की स्वत: अत्यंत चातुर्याने विचार करुन या मंडळींना पक्ष निवडण्याचा आपलाच फॉर्मुला वापरला आहे. यातून कुणाच्या सल्ल्याने नव्हे तर आपल्या निर्णयाने..., आपल्याच मनाने..., त्यांनी आपला मार्ग निवडून आपल्या यशाची आणि अस्तित्वाची वाट मोकळी करुन दिली आहे.**

### दिलीपरावांच ठरलंय पण... पत्ता मोक्याच्या वेळी

शिक्षण, साखर कारखानदारी, बँकिंग या क्षेत्रात आपलं अधिराज्य गाजवित असलेले माजी आ. दिलीप माने यांनी दक्षिण तालुक्यात गावभेट दौरा सुरु केला आहे. आगामी विधानसभेसाठी ही त्यांची पेरणी मानली जात आहे. दोन टर्मच्या विश्रांतीनंतर त्यांनी शहर मध्यच्या गदारोळात न घुसता दक्षिणचाच मार्ग निवडल्याचे दिसून येत आहे. गेल्या खेपेस त्यांनी शहर मध्यमधून शिवसेनेच्या वतीने निवडणूक लढविली होती. पण सेनेची दोन शकले उडाल्याने त्यांनी दोन्ही सेना गटांपासून दूर राहणे पसंत केले आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचीही शकले उडाल्याने पुन्हा त्यांची पंचाईत झाली आहे. शरद पवार आणि अजित पवार या दोन्ही नेत्यांची ते मर्जी सांभाळून आहेत. पण मार्ग कुठला निवडावा?, हा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. गेली दोन टर्म हा मतदारसंघ भाजपाच्या ताब्यात आहे. महायुतीतील शिंदे गटात किंवा राष्ट्रवादीच्या अजित पवार गटात गेलं तर भाजपा सहजासहजी हा मतदारसंघ त्यांना सोडणार नाही. आणि इकडे शरद पवार गटात गेलं तर हा मतदारसंघावर आघाडीत काँग्रेस किंवा ठाकरे गटाची शिवसेना दावा करणार, हे निश्चित. हे अभेद्य चक्र सध्या दिलीपमालकांसमोर उभे आहे. या चक्राला भेदून ते कुठला मार्ग निवडणार, याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. परवाच त्यांनी, दक्षिणमधूनच निवडणूक लढविणार पण पक्ष आणि चिन्ह त्यावेळीच कळेल, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे दिलीपमालकांच्या मनात नेमके काय चालले आहे, याचा कानोसा घेण्याचा प्रयत्न सर्वचजण करीत आहेत.

### बबनदादांनी खा. निंबाळकरांना करुन दिला मार्ग मोकळा

माढा तालुक्यात राजकीय, शैक्षणिक, सहकार, सामाजिक क्षेत्रात अधिराज्य गाजवित असलेले आ. बबनदादा शिंदे हे एक जिल्ह्याच्या राजकारणात बडे पस्थ मानले जाते. माढ्यात त्यांची आमदारकीची सहावी टर्म सुरु आहे. तर दुसरीकडे त्यांचे बंधू आ. संजयमामामा शिंदे यांनी करमाळ्याचा गड जिंकला आहे. माढ्याबरोबर आता करमाळ्यातही शिंदे बंधूचे प्रस्थ वाढले आहे. त्यामुळे खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्याशी त्यांचा चांगला दोस्ताना वाढला आहे. परवाच्या श्रीपूर येथे झालेल्या एका कार्यक्रमात आ. बबनदादा शिंदे यांनी, खा. रणजितसिंह हे आमच्या विरोधी पक्षाचे खासदार असले तरी त्यांनी आम्हाला विकासकामात नेहमीच सहकार्याची भूमिका घेतली आहे. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत त्यांना माढा व करमाळा मतदारसंघातून दोन लाखांचे मताधिक्क्य मिळवून देण्याची ग्वाही दिली आहे. आ. बबनदादांच्या या भूमिकेमुळे खा. रणजितसिंहाना हुरुप आला असून त्यांचा बऱ्यापैकी मार्ग मोकळा झाल्याचे मानले जात आहे.

### सुरेश पाटलांच्या मार्ग अर्ध्यावरच थांबविला

मनपातील माजी सभागृह नेते सुरेश पाटील हे शहर उत्तर मतदारसंघात भाजपाचे स्थानिक वजनदार नेते मानले जातात. मध्यतंरी मालकशाहीवर तोंडसुख घेत त्यांनी भाजपाचा सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. त्यांची बीआरएसच्या दिशेने वाटचार सुरु होती. दरम्यान काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे आणि भाजपामतून काँग्रेसमध्ये गेलेले सुरेश पाटील यांचे जवळचे मित्र प्रा. अशोक निंबर्गी यांनी पाटील काँग्रेसच्या गळाला लागतील काय?, याची चाचपणी केली होती. पण भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांना शांत राहण्याचे सांगून भेटीसाठी बोलावले. परवा पाटील आणि बावनकुळे यांची भेट झाली. त्यांच्यातील चर्चेतून सुरेश पाटील यांनी भाजपाच राहण्याचा इरादा पक्का करुन आपला पुढील अडथळ्याचा मार्ग बंद करुन घेतला आहे. यातून एवढे मात्र पक्के झाले की सुरेश पाटील यांनी टाकलेली 'पुढे चाल...' यशस्वी ठरली गेली आहे. यामुळे आता भाजपाला शहर उत्तरमध्ये बळ मिळणार आहे. यामध्ये भाजपाचे नूतन शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांचीी भूमिका महत्वाची मानली जात आहे.

### येमी दिड्डीकाका... बीआरएस.. आटला?

तेलगंणाच्या बीआरएसने सोलापुरातील राजकीय पक्षांना डिवचण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या गळाला पाच-सहा मासेही लागले आहेत. यातील माजी खा. धर्मण्णा सादूल प्रकृती अस्वास्थामुळे निसटले आहेत. आता बीआरएसने भाजपाचे कट्टर पुरस्कर्ते माजी नगरसेवक पांडुरंगकाका दिड्डी यांच्यावर जाळे टाकले आहे. दिड्डीकाका हे भाजपाचे आ. विजयकुमार देशमुख यांच्या मर्जीतले. तसे ते आ. सुभाष देशमुख यांच्याशीही जवळीक साधून असतात. ते भाजपाचा पूर्व भागातील विश्वासू लोकल नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. ते सोलापूर शहर भाजपाच्या अध्यक्षपदासाठी इच्छुक होते. तसा शब्द म्हणे विजयमालकांनी त्यांना दिलेला. पण कुठे माशी शिंकली कुणास ठाऊक?. विजयमालकांच्याच गटातील नरेंद्र काळे यांची अध्यक्षपदी वर्णी लागली. आणि दिड्डीकाकांचे अध्यक्षपदाचे स्वप्न भंगले. त्यामुळे आता दिड्डीकाका बीआरएसच्या वाटेवर असल्याचे बोलले जात आहेत. नुकतेच बीआरएसमध्ये गेलेले दशरथ गोप आणि पांडुरंग दिड्डी पद्मशाली शिक्षण संस्थेत काम करतात. त्यामुळे दिड्डीकाकांना बीआरएसमध्ये आणण्याची जबाबदारी गोप यांच्यावर सोपवल्याचे बोलले जात आहे. बघू या, दिड्डीकाका यास कसा प्रतिसाद देतात आणि आपला राजकीय मार्ग निवडतात ते. पण पूर्व भागात 'येमी दिड्डीकाका...बीआरएस... आटला?', अशी प्रश्नार्थक चर्चा मात्र जोरात सुरु आहे.

## भाजपात मोहोळ तालुका अध्यक्षपदासाठी रसीखेच

**भारतीय जनता पार्टीच्या मोहोळ तालुका अध्यक्षपदाची मुदत संपत आली असून तालुका अध्यक्ष पदासाठी विद्यमान तालुकाध्यक्ष सुनील चव्हाण यांच्यासह जवळजवळ पाच ते सहाजण इच्छुक आहेत. यावेळेस तालुका अध्यक्षपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याबाबत कार्यकर्त्यांमध्ये चर्चा होत असून आपल्या पक्षश्रेष्ठींकडे जोरदार फिल्डिंग लावण्याचा प्रयत्न इच्छुक मंडळी करीत आहेत.**

भारतीय जनता पार्टीची राज्यामध्ये व केंद्रामध्ये सत्ता आहे त्यामुळे कार्यकर्त्यांच्या संख्येतही वरचेवर वाढ होत असून त्यामध्ये पदासाठी स्पर्धा ही निर्माण होऊ लागली आहे . याबाबत विद्यमान तालुका अध्यक्ष सुनील चव्हाण हे पक्षाचे तालुकाध्यक्ष असूनही भीमा सहकारी साखर कारखान्याचे संचालक आहेत. राज्यसभेचे खासदार व भीमा कारखान्याचे चेअरमन धनंजय महाडिक यांचे निकटवर्तीय समजले जातात .याबाबत पुढील तालुकाध्यक्षपदी कोण असणार?, याकडे लक्ष लागले आहेत. त्यांनी पुन्हा एकदा हे पद आपल्यालाच मिळावे म्हणून पक्षाकडे आग्रह धरला आहे. शहराध्यक्ष सुशील क्षीरसागर तालुका अध्यक्षपदासाठी इच्छुक असून त्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. पेनूरचे माजी सरपंच व सध्याचे विद्यमान तालुका सरचिटणीस रमेश माने हेही तालुका अध्यक्ष पदासाठी इच्छुक आहेत. मागील काही दिवसांपूर्वी पक्षाने मध्य प्रदेश या राज्यात त्यांची निरीक्षक म्हणूनही नेमणूक केली होती. अविनाश पांढरे हे सत्ता असो अथवा नसो परंतु बऱ्याच वर्षापासून पक्षाशी एकनिष्ठ आहेत. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लहानपणापासूनच स्वयंसेवक आहेत. माजी शहराध्यक्ष म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे.तेही या रेसमध्ये आहेत. युवा मोर्चाचे अंकुश अवताडे यांनीही वरिष्ठांच्या भेटीगाठी आणि हेलपाटे वाढवले असून आपण कसे तालुकाध्यक्ष पदासाठी योग्य आहोत, हे दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न सध्याच्या काळात सुरू झाला आहे. याशिवाय रमेश माने, अविनाश पांढरे, सुशील क्षीरसागर, अंकुश अवताडे, महेश सोवनी यांच्यापैकी कोणाला संधी मिळणार का पुन्हा सुनील चव्हाण यांनाच संधी मिळणार, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## आवाज कुणाचा...

## रिपाइंच्या गावभेट दौऱ्यांमुळे कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाने सध्या गावभेट दौरे सुरू केले असून संपर्क अभियानाची मोहिम त्यांनी उघडलेली दिसत आहे. यामुळे रिपब्लिकन चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाला उधाण आलेले दिसत असून कार्यकर्त्यांमध्ये चैतन्याचे वातावरण आहे.**

डी.एस.गायकवाड





विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील पक्ष म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा उल्लेख केला जातो. चळवळीत काम करणाऱ्या प्रत्येक माणसाला नेहमीच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा सार्थ अभिमान वाटत आलेला आहे. नेहमी संघर्ष आणि अन्यायाविरुद्ध झुंजारपणे लढणे हेच आजपर्यंत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे ब्रीद राहिले आहे. आजपर्यंतच्या इतिहासात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने असंख्य दलित अत्याचारांना न्याय मिळवून दिला आहे. दलितांच्या न्याय हक्कासाठी झटणारी ही सर्वात मोठी संघटना समजली जाते. देशाच्या राजकीय सामाजिक पटलावर नेहमीच रिपब्लिकनचा आवाज हा खणखणीत राहिला आहे. पण असे असताना सुद्धा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला सत्तास्थानी पोहोचता आले नाही. इतर पक्षाशी जुळवून घेत एक दोन पदावर समाधान मानावे लागले आहे पण यातून सुद्धा त्यांनी यशालाच गवसणी घातली आहे असे म्हणावे लागेल कारण सत्ते मध्ये आपली माणसे पाठवून दलित अत्याचार असेल किंवा विविध दलितांच्या प्रश्नांना त्यांनी सोडवण्याचा प्राधान्याने प्रयत्न केला आहे. केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी या पक्षाची धुरा सांभाळताना देशभरातील दलित बांधवांना विश्वास दिला. पक्षाची अधिकृत नोंदणी केली व या माध्यमातून पक्षाची ध्येयधोरणे ते देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवताना दिसत आहेत. महाराष्ट्र राज्यात देखील पँथरची चळवळ घडली आणि त्यानंतर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या माध्यमातून चळवळीला उभारी देण्याचे काम झाले. पण चळवळीला फुटिरतेचा शाप असतो, असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकसंध कधी होऊ शकला नाही. अनेक प्रयत्न झाले पण ते निष्पळ ठरले. तरीही केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी रिपब्लिकन चा आवाज कधी कमी होऊ दिला नाही सध्या महाराष्ट्र राज्याची धुरा सोलापूरचे राजाभाऊ सरवदे हे यशस्वीपणे सांभाळताना दिसत आहेत. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला खऱ्या अर्थाने शिस्तबद्ध करण्यामध्ये राजाभाऊ सरवदे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. प्रदेशाध्यक्ष पदाची धुरा हाती घेतल्यापासून त्यांनी नोंदणी अभियान, आणि गाव भेट दौऱ्याच्या माध्यमातून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला वेगळा आयाम प्राप्त करून दिला आहे. त्यांच्या आदेशानुसार प्रत्येक तालुकाध्यक्ष आपल्या टीमला घेऊन गावागावात पक्षाचा प्रचार प्रसार, गावातील समस्या, पक्षाची मजबूत बांधणी करताना दिसत आहेत. यामुळे पक्षाची ध्येय धोरणे तळागळात रुजताना दिसत आहेत. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये चैतन्याचे वातावरण पसरलेले दिसत आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला गटातटाचा कलंक आहे तो मिटवण्यासाठी सर्व गटांना एकत्र करून सोलापूर जिल्ह्यात राजाभाऊ सरवदे यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. मध्यंतरी त्यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियातील दोन गटांना एकत्रित करून एकत्र येण्याचे आवाहन केले व त्यानुसार अनेक कार्यकर्ते एकत्रित काम करताना दिसत आहेत यामुळे पक्ष मजबुतीकडे वाटचाल करताना दिसत आहे व पक्षाची ताकद देखील वाढताना दिसत आहे.

## मुद्दा विकासाचा वाद हमरी-तुमरीचा

**तीर्थक्षेत्र पंढरपूरसाठी राज्यात कोणत्याही विचाराचे सरकार आले तरी पंढरपूरसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी दिला जातो. पंढरपूरकर किंवा पंढरपूरला येणाऱ्या भाविकांसाठी राज्य सरकारकडून अनेक योजनेच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा पुरवठा केला जात आहे. मात्र पंढरपूरसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला तरी पंढरपूर शहर हे बकाल असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पंढरपूरचे आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूरच्या विकास कामासाठी खर्च केलेले ५०० कोटी रुपयांचा निधी कुठे गेला? असा प्रश्न विधानसभेत उपस्थित केल्यामुळे अवताडे विरुद्ध परिचारक असा वाद पुन्हा पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**



पंढरपुरात आतापर्यंत ५०० कोटी रुपयांच्या आसपास निधी खर्च केला आहे. मात्र पंढरपुरातील रस्त्यांची दुर्दशा पाहायला मिळत आहे. पंढरपूर शहरात कोट्यावधी रुपये खर्च करून रस्ते बांधणी केली आहे. मात्र त्या रस्त्यावर खड्डेच खड्डे दिसत आहेत. नागरिकांना त्यामुळे प्रचंड मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. अनेक भागात डुकर-गाढवांचा वावर पाहायला मिळत आहे. त्यामुळे भाविकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. वारीच्या कालावधीमध्ये पंढरपुरातील ड्रेनेजच्या चेंबरमधून गटारीचे पाणी रस्त्यावरून वाहत असते. पंढरपूर शहरात पिण्याच्या पाण्याच्या दहा ते बारा मोठ्या टाक्या उभा केलेले आहेत. असे असताना देखील केवळ एक ते दीड तास पाणी नळाला येत आहे. तसेच अनेक उपनगरात पिण्याच्या पाण्याची सोय देखील नगरपालिका करू शकली नाही. पंढरपूर शहरासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मिळतो. मात्र नागरिकांसाठी सुख सुविधा परिचारक यांच्या ताब्यातील नगरपालिका देऊ शकली नाही. त्यामुळे अपुऱ्या सुविधा असल्यामुळे ५०० कोटींचा निधी कुठे गेला? याची चौकशी करण्याची मागणी आ. आवताडे यांनी विधानसभेत केली.

सूरज सरवदे

पंढरपूर नगरपालिकेवर गेल्या वीस वर्षापासून परिचारक गटाचे वर्चस्व आहे. सध्या नगरपालिकेवर प्रशासक आहे मात्र परिचारक गटाच्या कार्यकाळात पंढरपुरातील अनेक विकास कामे झाली आहेत. मात्र ती कुठेही प्रामुख्याने दिसत नाहीत. पंतप्रधान आवास योजना चुकीच्या जागी बांधल्यामुळे नागरिकांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले आहे. सध्या ९९२ घरे धुळ खात पडून आहेत. अर्बन बँक ते अंबाबाई पटांगण सिमेंट रस्ता, भाई राऊळ पुतळा ते टाकळी रोड हा सिमेंट काँक्रेटचा रस्ता करण्यात आला होता. काही दिवसातच या रस्त्याची दुर्दशा झाल्याचे पाहायला मिळत आहे. पंचवीस वर्षे रस्त्याला काही होणार नाही म्हणून सिमेंट काँक्रीटचे रस्ते बनवण्यात आले आहेत. मात्र अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. कोट्यावधी रुपये खर्च करून बांधलेल्या रस्त्यावरून नागरिकांना हाल सोसावे लागत आहे.

### आवताडेंची विकासासाठी आता आग्रही भूमिका

पंढरपुरात परिचारकांना सक्षम विरोधक नसल्यामुळे नगरपालिकेच्या कोणत्याही योजनेबाबत निकृष्ट झालेल्या कामाबाबत कोणीही आवाज उठवत नाही. त्यामुळे सत्ताधाऱ्यांचे चांगलेच फावल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे स्वतः आ. अवताडे यांनी पंढरपूरच्या विकासासाठी आता आग्रही भूमिका घेतली आहे. केंद्रात आणि राज्यात सत्ता असताना देखील पंढरपूरचा विकास होताना दिसत नाही. त्यामुळे ते आक्रमक झालेले आहेत. पंढरपूरच्या विकास होण्याच्या दृष्टिकोनातून समाधान आवताडे यांनी ५०० कोटी रुपये कुठे गेले? याचा हिशोब हा सरकारकडे मागितला आहे. त्यामुळे परिचारक विरुद्ध अवताडे असा संघर्ष येणाऱ्या काही काळात पाहायला मिळू शकतो.

## शरद पवारांसारखीच अवस्था बळीरामकाका साठेंची!

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते बळीराम काका साठे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची राजकारणातील अवस्था सारखीच झाली असल्याचे चित्र सध्या सोलापूर जिल्ह्यात दिसून येत आहे. राज्याच्या राजकारणात मागील महिन्यापासून ज्या घटना घडल्या जात आहेत तशाच घटना जिल्ह्यातील उत्तर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष व ज्येष्ठ नेते बळीराम काका साठे यांच्या बाबतीतही घडत आहेत. त्यामुळेच काकांची अवस्था मोठ्या साहेबांसारखी झाली आहे.**



बळीराम सर्वगोड

शरद पवारांचे पुतणे अजितदादा पवार यांचा एक मोठा गट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून बाहेर पडल्यानंतर राज्यामध्ये खळबळ उडाली आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष संपतो की काय ? असे वातावरण निर्माण झाले . मात्र या चर्चा होत असताना खुद्द शरद पवार यांनी स्वतः ला सावरत खंबीरपणे पक्षाला नव्याने उभारी आणण्यासाठी स्वतः रिंगणात ठाम पणे उभे राहत जिल्हा भेटीचा कार्यक्रम राबवून पक्षाबद्दल एक वेगळ पण राज्याला दाखवून दिले. राज्यातील काही ज्येष्ठ मंडळी तर काही तरुण मंडळी पक्षावर प्रेम आणि निष्ठा दाखवणारी मंडळी शरद पवाराच्या बरोबर राहिली. पुतण्या ज्याप्रमाणे पवार साहेबांना सोडून गेला अशीच अवस्था काका साठे यांची जिल्ह्यात त्यांच्या घरातूनच झाली. त्यांचे चिरंजीव जितेंद्र बाबा साठे आणि जितेंद्र यांचे चिरंजीव जयदीप साठे या दोघांनी चक्क अजित पवारांचे नुकतीच त्यांच्या घरी भेट घेतली. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात आणि उत्तर तालुक्यात एकच खळबळ उडाली. वडील एका गटात आणि मुलगा नातू एका गटात असा पक्ष फुटीचा प्रसंग एकाच घरात आले. त्यामुळे वेगळे वळण लागले.

उत्तर तालुक्यामध्ये राष्ट्रवादीची ताकद मोठ्या प्रमाणात आहे. गेल्या अनेक वर्षापासून येथे राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीचाच उमेदवार निवडून येतो. जिल्ह्यातही आमदारांची संख्या जरी कमी असली तरी तेथे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्राबल्य मोठ्या प्रमाणात आहे. राज्यांमध्ये शरद पवारांची जी प्रतिष्ठा आहे तशाच पद्धतीची प्रतिष्ठा जिल्ह्यामध्ये काका साठे यांची आहे काका साठे यांचे दीपक आबा साळुंखे, आ. यशवंत माने, राजन पाटील, दिलीप सोपल, भालके परिवार वगैरे बरोबर काका साठे यांचे संबंध चांगले आहेत .त्यामुळे काकांचे जिल्ह्यामध्ये एक चांगली प्रतिष्ठा आहे. परंतु पवारांच्या घराण्या राजकारणाची फाटाफूट झाली त्याचप्रमाणे काका साठे यांच्याही घरात तसेच राजकारण सुरू झाले आहे.

### काका साठे कायम पवारांसोबतच राहणार

काका साठे यांचे चिरंजीव आणि नातू जयदीप हे अजित दादांच्या गटात जरी गेले असले तरी काका साठे यांच्याकडे ज्येष्ठ मंडळी आणि तरुण मंडळींची संख्या मोठी आहे. काका साठे यांना मानणारा वर्ग मोठा आहे .त्यामुळे काका स्वतःच मुलगा आणि नातू अजित पवार यांच्या गटात जरी गेली असली तरी त्याचा फरक आमच्यावर पडणार नाही, असे स्पष्ट सांगत आहेत तसेच ते जरी अजितदादांच्या गटात केले असले तरी मी मात्र पवार साहेबांना सोडणार नाही, असेही ते ठणकावून सांगत आहेत.